रायगड, नवी मुंबई
राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक ३१७
www.ramprahar.com
◆ शुक्रवार, ५ जून २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

### महाराष्ट्र बोर्डाची आता डिजिटल क्रांतीकडे वाटचाल

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावी-बारावीच्या परीक्षा व्यवस्थेत मोठ्या बदलाचा निर्णय घेतला आहे. परीक्षा प्रक्रिया सुरक्षित, पारदर्शक आणि पर्यावरणपूरक बनविण्यासाठी पुढील शैक्षणिक वर्षापासून प्रश्नपत्रिका थेट ई-मेलद्वारे परीक्षा केंद्रांवर पाठविण्यात येणार आहेत. यामुळे प्रश्नपत्रिका छपाई, वाहतूक व सुरक्षेशी संबंधित अडचणींवर मात होणार असल्याचे मानले जाते. महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघ व राज्य शिक्षण मंडळ यांच्यात मुंबईतील मुख्यालयात झालेल्या संयुक्त बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. नवीन प्रणालीअंतर्गत प्रश्नपत्रिका परीक्षा सुरू होण्याच्या काही मिनिटांपूर्वी संबंधित परीक्षा केंद्रांच्या अधिकृत ई-मेल आयडीवर पाठविण्यात येतील.

## अंतरंग

रायगड जिल्ह्यात ७० टँकरद्वारे पाणीपुरवठा/२
मागेल त्याला झाड अभियानाचा शुभारंभ/६
अफगाणिस्तानविरुद्धच्या वन डे मालिकेतून विराट बाहेर/८

## विधान परिषद निवडणूक

# १७ पैकी पाच जागा बिनविरोध

**मुंबई : महाराष्ट्र विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज संस्था मतदारसंघाच्या १७ जागांसाठी निवडणूक प्रक्रिया सुरू आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या गुरुवारच्या शेवटच्या दिवशी राज्यभरात मोठ्या घडामोडी पाहायला मिळाल्या. राज्यातील सत्ताधारी महायुतीच्या उमेदवारांसमोर महाविकास आघाडीने आव्हान उभे करण्याचा प्रयत्न केला, मात्र मविआच्या काही उमेदवारांनी संख्याबळाचे कारण, मित्रपक्षांचे सहकार्य मिळत नसल्याचा आरोप करीत माघार घेतली. अर्ज माघारीच्या दिवशी पाच जागा बिनविरोध झाल्या. यात दोन शिवसेना, दोन राष्ट्रवादी काँग्रेस आणि एका जागेवर भाजपने बिनविरोध विजय मिळवला. आता शिल्लक १२ जागांवर महायुती आणि महाविकास आघाडीत सामना रंगणार आहे.**

## कोकणात महाविकास आघाडीला धक्का!

### बाळ मानेंच्या माघारीने अनिकेत तटकरे बिनविरोध



**रत्नागिरी : प्रतिनिधी**

रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीत अखेरच्या क्षणी झालेल्या नाट्यमय घडामोडींमुळे अपेक्षित राजकीय लढत टळली. महाविकास आघाडीकडून शिवसेनेचे (ठाकरे गट) उमेदवार सुरेंद्र उर्फ बाळ माने यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने महायुतीचे उमेदवार अनिकेत तटकरे यांचा विधान परिषदेकडे जाण्याचा मार्ग बिनविरोध मोकळा झाला आहे.

अर्ज माघारीच्या अंतिम दिवशी गुरुवारी बाळ माने यांनी भाजपचे मंत्री नितेश राणे यांच्या समवेत रत्नागिरी जिल्हाधिकारी कार्यालयात उपस्थित राहून उमेदवारी मागे घेतल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले. महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात थेट सामना रंगण्याची शक्यता असताना या निर्णयाने निवडणुकीतील सर्वच समीकरणे बदलली आहेत.

कोकणातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील मतदारसंख्येच्या गणितात महायुतीचे पारडे आधीपासूनच जड मानले जात होते. शिवसेना (शिंदे गट), भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या एकत्रित संख्याबळामुळे अनिकेत तटकरे यांची स्थिती भक्कम होती, मात्र निवडणूक लढविण्याच्या तयारीत असलेल्या बाळ माने यांच्या माघारीने उरलेल्या सर्व शक्यता आता संपुष्टात आल्या आहेत.

उमेदवारी अर्ज मागे घेतल्यानंतर माध्यमांशी बोलताना बाळ माने यांनी महाविकास आघाडीतील अपुऱ्या समन्वयावर बोट ठेवले. काही मतदार तीर्थयात्रेला गेल्याने तसेच आवश्यक सह्यांसाठी अपेक्षित सहकार्य न मिळाल्याने अडचणी निर्माण झाल्याचे त्यांनी सांगितले. याशिवाय मतदारसंघात 'घोडेबाजार' सुरू असल्याची माहिती मिळाल्याने कोकणच्या राजकीय संस्कृतीला धक्का पोहचू नये, या भूमिकेतून माघार घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

बाळ माने यांच्या माघारीनंतर कोकणातील विधान परिषद निवडणुकीतील रंगत ओसरली असून महायुतीला मोठा राजकीय लाभ झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. गुरुवारी अर्ज मागे घेण्याच्या दिवशी बाळ माने यांच्यासह अपक्ष उमेदवार अरविंद म्हात्रे यांनी आपले नामनिर्देशन पत्र मागे घेतले. तसेच अनिल चोपडा व मानसी म्हात्रे यांनीदेखील आपले नामनिर्देशन पत्र मागे घेतले.

### माने यांची ठाकरे गटातून हाकालपट्टी

राज्यातील १७ स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत अर्ज मागे घेण्याच्या अखेरच्या दिवशी गुरुवारी ठाकरे गटाला मोठा धक्का बसला. रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग विधान परिषद मतदारसंघातून महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार (शिवसेना ठाकरे गट) सुरेंद्र उर्फ बाळ माने यांनी थेट भाजपचे मंत्री नितेश राणे यांच्यासोबत रत्नागिरी जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल होत आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. या धक्कादायक निर्णयामुळे ठाकरे गटाकडून त्यांची पक्षातून हाकालपट्टी करण्यात आली. पक्षविरोधी कारवायांत सहभागी झाल्याबद्दल पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी बाळ माने यांची पक्षातून हाकालपट्टी केल्याचे समजते.

## वरुणराजाचे केरळमध्ये धडाक्यात आगमन

### पुढील ४८ तासांत महाराष्ट्राच्या दारात



**नागपूर : प्रतिनिधी**

नैर्ऋत्य मोसमी वाऱ्यांनी (मान्सून) गुरुवारी (दि. ४) केरळमध्ये अधिकृतपणे प्रवेश केला. नेहमीच्या तारखेच्या तुलनेत यंदा मोसमी पावसाचे आगमन तीन दिवस उशिराने झाले असले तरी आता त्याच्या पुढील प्रगतीसाठी वातावरण अनुकूल बनले आहे. पुढील दोन ते तीन दिवसांत मोसमी पाऊस गोव्याच्या संपूर्ण भागात, महाराष्ट्राच्या काही भागांत तसेच आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि ईशान्य भारतातील काही राज्यांमध्ये पुढे सरकण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने वर्तवली आहे.

साधारणपणे नैर्ऋत्य मोसमी पाऊस १ जून रोजी केरळ किनारपट्टीवर दाखल होतो. मात्र यंदा समुद्रावरील आणि वातावरणातील काही बदलांमुळे त्याच्या आगमनाला विलंब झाला. अखेर गुरुवारी आवश्यक हवामानविषयक निकष पूर्ण झाल्यानंतर हवामान विभागाने मोसमी पाऊस केरळमध्ये दाखल झाल्याची अधिकृत घोषणा केली. हवामान विभागाच्या माहितीनुसार मोसमी पावसाने अरबी समुद्रातील दक्षिण-पश्चिम आणि दक्षिण-पूर्व भाग, मध्य अरबी समुद्रातील काही भाग, लक्षद्वीप बेटे, केरळ आणि माहेचा संपूर्ण प्रदेश, कर्नाटक व तामिळनाडूचा काही भाग तसेच बंगालच्या उपसागरातील विस्तृत क्षेत्र व्यापले आहे. त्यामुळे दक्षिण भारतात पावसाळ्याची औपचारिक सुरुवात झाली आहे.

#### तीन जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट

दरम्यान, पुढील दोन ते तीन दिवस विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये मान्सूनपूर्व पावसाचा प्रभाव दिसून येणार आहे. हवामान विभागाने वर्धा, यवतमाळ आणि चंद्रपूर या जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. या भागांमध्ये हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसासह मेघगर्जना आणि जोरदार वाऱ्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. काही ठिकाणी गारपीट होण्याचाही अंदाज वर्तवण्यात आला आहे.

मोसमी पावसाच्या आगमनासाठी आवश्यक हवामान स्थिती दोन दिवसांत बळकट झाली. आग्नेय अरबी समुद्रावर संवहनी ढगांची निर्मिती वाढली. समुद्रसपाटीपासून साडेचार किलोमीटरपर्यंत पश्चिमेकडील दमदार वारे सक्रिय झाले. खालच्या स्तरावरील वाऱ्यांचा वेग ताशी २० ते २५ नॉट्स नोंदविण्यात आला. केरळमध्ये गेल्या दोन दिवसांत बहुतांश भागांत व्यापक पाऊस झाला असून काही ठिकाणी मुसळधार पावसाची नोंद झाली.

## पुणे विषारी दारूप्रकरणी रसायन पुरवठादार पितापुत्र जेरबंद

### सीआयडीची मोठी कारवाई



**पुणे : प्रतिनिधी**

दापोडी आणि हडपसर परिसरातील विषारी हातभट्टी दारू प्रकरणात राज्य गुन्हे अन्वेषण विभागाने मोठी कारवाई करीत दारूमध्ये विषारी रासायनिक पदार्थांचा पुरवठा करणाऱ्या मुख्य संशयित पितापुत्राला अटक केली आहे. या कारवाईमुळे प्रकरणाच्या तपासाला महत्त्वाचे वळण मिळाले असून संपूर्ण पुरवठा साखळी उघडकीस आणण्याच्या दिशेने तपास यंत्रणा वेगाने पावले टाकत आहे.

सीआयडीच्या पुणे पथकाने नवी मुंबईतील वाशी गावात छापा टाकून अरुण जगदंब चौबे (५९) आणि अभिषेक अरुण चौबे (३४) या दोघांना ताब्यात घेतले. चौकशीनंतर त्यांना अटक करण्यात आली. अटक केलेल्या आरोपींना पिंपरी येथील न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने त्यांना चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

पिंपरी-चिंचवडमधील दापोडी आणि पुण्यातील हडपसर परिसरात काही दिवसांपूर्वी विषारी हातभट्टीची दारू सेवन केल्यानंतर भीषण दुर्घटना घडली होती. यात २० हून अधिक जणांचा मृत्यू झाला असून अनेक नागरिक गंभीर विषबाधेमुळे रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. या घटनेमुळे संपूर्ण राज्यात खळबळ उडाली होती. मृतांच्या कुटुंबीयांकडून दोषींवर कठोर कारवाईची मागणी होत असताना सरकारने या प्रकरणाचा तपास सीआयडीकडे सोपवला होता.

## प्रसिद्ध निर्माते पहलाज निहलानी यांचे निधन




**मुंबई :** बॉलीवूडचे प्रसिद्ध निर्माते आणि केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळाचे माजी अध्यक्ष पहलाज निहलानी यांचे गुरुवारी (दि. ४) निधन झाले. ते ७६ वर्षांचे होते. प्रदीर्घ आजाराने त्यांचे निधन झाले. गेल्या काही दिवसांपासून प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना नानावटी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारानंतर त्यांना घरी आणण्यात आले होते, मात्र गुरुवारी सकाळी ९.३० वाजता त्यांची प्राणज्योत मालवली.

## रायगडावर आजपासून शिवराज्याभिषेकाचा लोकोत्सव

**महाड : प्रतिनिधी**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ऐतिहासिक राज्याभिषेक दिनानिमित्त दुर्गराज रायगडावर ५ आणि ६ जून रोजी भव्य शिवराज्याभिषेक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. 'शिवराज्याभिषेक सोहळा जागर शौर्य भक्तीचा' या संकल्पनेवर आधारित या दोन दिवसीय सोहळ्यात ऐतिहासिक, धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल पाहायला मिळणार असून राज्यभरातून हजारो शिवभक्त रायगडावर दाखल होणार आहेत. याबाबतची माहिती अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समिती, दुर्गराज रायगडचे उपाध्यक्ष प्रशांत दरेकर यांनी शासकीय विश्रामगृह, महाड येथील पत्रकार परिषदेत दिली.



सोहळ्याची सुरुवात शुक्रवारी दुपारी ३.३० वाजता पाचाड येथील राजमाता जिजाऊ स्मृतिस्थळ येथे अभिवादनाने होणार आहे. त्यानंतर दुपारी ४ वाजता युवराज संभाजीराजे छत्रपती व शहाजीराजे छत्रपती यांचे स्वागत करण्यात येईल. स्वागत समारंभानंतर शिवभक्तांच्या उपस्थितीत रायगड चढाईला प्रारंभ होणार आहे. रायगडावर आगमनानंतर दुपारी ४.१५ वाजता नगारखान्यात स्वागत समारंभ पार पडेल. सायंकाळी ४.३० वाजता युवराज संभाजीराजे छत्रपती यांच्या हस्ते धार तलवार पीठ तसेच 'युद्धकला महाराष्ट्राची' या उपक्रमाचे उद्घाटन होणार आहे. त्यानंतर सायंकाळी ५ वाजता ढोलताशे, लेझीम आणि वारकरी संप्रदायाच्या टाळ-मृदंगाचा गजर अनुभवता येणार आहे. **(पान २ वर..)**

## पंतप्रधान नरेंद्र मोदी मोडणार नेहरूंचा ६२ वर्षांचा विक्रम

### ४,३९९ दिवसांसह ठरणार देशाचे 'नंबर वन' नेतृत्व



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताच्या राजकारणात १० जून २०२६ रोजी एक ऐतिहासिक टप्पा नोंदवला जाणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे देशाचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांचा विक्रम मागे टाकत भारतातील सर्वाधिक काळ कार्यरत असलेले 'निवडून आलेले पंतप्रधान' ठरणार आहेत. २६ मे २०१४ रोजी प्रथमच पंतप्रधानपदाची शपथ घेतलेल्या नरेंद्र मोदी यांनी २०१४, २०१९ आणि २०२४ अशा सलग तीन लोकसभा निवडणुकांमध्ये विजय मिळवत केंद्रातील सत्ता कायम राखली. १० जून २०२६ रोजी त्यांच्या पंतप्रधानपदाचा सलग ४,३९९ वा दिवस पूर्ण होईल. यासह ते पंडित नेहरू यांच्या ४,३९८ दिवसांच्या 'निवडून आलेल्या' पंतप्रधानपदाच्या कार्यकाळाला मागे टाकतील.

पंडित नेहरू यांनी स्वातंत्र्यानंतर १५ ऑगस्ट १९४७ ते २७ मे १९६४ या काळात एकूण ६,१३० दिवस पंतप्रधानपद भूषवले, मात्र १९४७ ते १९५२ या काळात ते अंतरिम सरकारचे प्रमुख होते. १३ मे १९५२ रोजी पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर त्यांनी 'निवडून आलेले' पंतप्रधान म्हणून शपथ घेतली. त्यानंतर २७ मे १९६४ रोजी त्यांच्या निधनापर्यंत त्यांचा निवडून आलेला कार्यकाळ ४,३९८ दिवस इतका होता. नरेंद्र मोदींचा संपूर्ण कार्यकाळ हा जनतेद्वारे थेट निवडून आलेल्या सरकारचा आहे. त्यामुळे १० जून रोजी ४,३९९ दिवस पूर्ण करत ते लोकशाही मार्गाने निवडून आलेले सर्वाधिक काळ सेवा करणारे पंतप्रधान ठरतील.

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे पंडित नेहरू यांच्यानंतर सलग तीन वेळा जनतेचा कौल मिळवून पंतप्रधान होणारे दुसरेच नेते आहेत. एकूण पंतप्रधानपदाच्या कार्यकाळाचा विचार केल्यास पंडित नेहरू ६,१३० दिवसांसह अद्यापही पहिल्या क्रमांकावर आहेत, मात्र 'निवडून आलेल्या' कार्यकाळाच्या हिशोबात नरेंद्र मोदी आता पहिल्या क्रमांकावर विराजमान होत आहेत.



# ‘पायाभूत प्रकल्पांमध्ये डेडलाइन न पाळणाऱ्यांना नवे कंत्राट नाही’

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याच्या आर्थिक आणि सामाजिक प्रगतीसाठी पायाभूत सुविधांच्या (इन्फ्रास्ट्रक्चर) प्रकल्पांची कामे विहित वेळेत पूर्ण होणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे कंत्राटदाराला देण्यात आलेल्या कालावधीतच प्रकल्प पूर्ण झाला पाहिजे, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी दिल्या. जे कंत्राटदार ठरवून दिलेल्या मुदतीत (डेडलाईन) कामे पूर्ण करणार नाहीत, अशा विलंबाने काम करणाऱ्या कंत्राटदारांना भविष्यात कोणतेही नवीन कंत्राट किंवा काम देऊ नये, असे कठोर निर्देश मुख्यमंत्र्यांनी संबंधित यंत्रणांना दिले. कंत्राटदारांनी प्रकल्पांना विलंब केल्यास देशाचे आणि पर्यायाने राज्याचे मोठे आर्थिक नुकसान होते, त्यामुळे प्रकल्पाच्या पूर्णत्वामध्ये होणारा कोणताही विलंब यापुढे खपवून घेतला जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.



सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित पायाभूत सुविधा 'मुख्यमंत्री वॉर रूम'च्या बैठकीत राज्यातील २० मोठ्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांचा सविस्तर आढावा घेताना मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, कुठल्याही परिस्थितीत पायाभूत सुविधांचे प्रकल्प हे तीन ते साडेतीन वर्षांमध्येच पूर्ण झाले पाहिजेत. यापुढे नवीन निविदा प्रक्रिया राबवताना, संबंधित कंत्राटदाराने त्याचे मागील प्रकल्प पूर्ण करण्यासाठी नेमका किती कालावधी लावला होता, या निकषाचा आवर्जून समावेश निविदा अटींमध्ये करावा, जेणेकरून कामाला गती येईल.

धारावी झोपडपट्टी पुनर्विकासाचा आढावा घेताना मुख्यमंत्र्यांनी धारावीमधील स्थानिक उद्योगांना बळ देण्याचे निर्देश दिले. तेथील अनधिकृत किंवा असंघटित अर्थव्यवस्था (इन्फॉर्मल इकॉनोमी) अधिकृत करण्यासाठी येथील उद्योजकांना 'स्टेट जीएसटी'मधून सवलत देण्याबाबत तातडीने कार्यवाही करावी, अशा सूचना त्यांनी दिल्या. तसेच, पुनर्विकासाच्या निविदा प्रक्रियेतील अंतर्गत मुद्द्यांसाठी वारंवार मंत्रिमंडळासमोर येण्याची आवश्यकता नसून, यंत्रणांनी संबंधित विभागांशी समन्वय साधून हे विषय मार्गी लावावेत, असे ते म्हणाले. याशिवाय ना. म. जोशी मार्ग, नायगाव आणि वरळी येथील बीडीडी चाळींचा पुनर्विकास गतिमान करण्यासाठी तेथील रहिवाशांना घरभाडे देऊन, सध्याची घरे विनाविलंब ताब्यात घेऊन प्रत्यक्ष काम सुरू करण्याचे आदेश त्यांनी दिले.

मुंबई उपनगरांतील दळणवळण वेगवान करणाऱ्या अनेक मोठ्या प्रकल्पांच्या कालमर्यादा या बैठकीत निश्चित करण्यात आल्या. विरार ते अलिबाग या 'मल्टी मॉडेल कॉरिडॉर'च्या प्रगतीसाठी भूसंपादनाची (लँड ॲक्विजिशन) प्रक्रिया अधिक गतिमान करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. या महामार्गामुळे आजूबाजूच्या जमिनींचे मूल्य मोठ्या प्रमाणावर वाढणार असून, या वाढीव मूल्याचा शासनाच्या माध्यमातून कसा उपयोग करून घेता येईल, याचे नियोजन करण्यास त्यांनी सांगितले. या मार्गालगत काही विशेष क्षेत्र निश्चित करून तिथे शासनाने जमिनी उपलब्ध करून द्याव्यात आणि गुंतवणूकदारांच्या माध्यमातून विशिष्ट उद्योगांचा विकास करावा, अशी संकल्पना त्यांनी मांडली.पुण्याचा आढावा घेताना पुणे वर्तुळाकार मार्ग (रिंग रोड) आणि 'मुळा व मुठा नदी पुनरुज्जीवन प्रकल्पा'साठी जमीन उपलब्ध करण्याचे आदेश देण्यात आले. तसेच, पुण्यातील मेट्रोचे जाळे विस्तारत असल्याने प्रवाशांच्या सोयीसाठी 'एकीकृत तिकीट व्यवस्था' (इंटिग्रेटेड तिकिटिंग) लागू करावी, असे त्यांनी सुचवले. छत्रपती संभाजीनगरच्या पाणीपुरवठा योजनेतील अडचणी दूर करून नागरिकांना मुबलक पाणी देण्याचे निर्देशही त्यांनी पालिका प्रशासनाला दिले.

# रायगड जिल्ह्यात १ जूनअखेर ७० टँकरद्वारे पाणीपुरवठा

## ७३ गावे व २५८ वाड्यांतील १ लाख ३१ हजार ९९ नागरिकांना दिलासा

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

जिल्ह्यात वाढत्या उष्णतेमुळे निर्माण झालेल्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद रायगडच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागामार्फत विविध तालुक्यांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. दि.०१ जून २०२६ अखेर जिल्ह्यात एकूण ७० टँकर कार्यरत असून त्याद्वारे ७३ गावे व २५८ वाड्यांमधील १ लाख ३१ हजार ९९ नागरिकांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यात येत आहे.




जिल्ह्यातील सर्व टँकर खासगी स्वरूपातील असून शासकीय टँकर अथवा मदतीचे टँकर कार्यरत नाहीत. सर्वाधिक टंचाईग्रस्त परिस्थिती पेण तालुक्यात असून येथे ९ गावे व ७६ वाड्यांसाठी १२ टँकर कार्यरत आहेत. या माध्यमातून २४ हजार ७४६ नागरिकांना पाणीपुरवठा केला जात आहे.

महाड तालुक्यात १४ गावे व ९८ वाड्यांसाठी ९ टँकरद्वारे २७ हजार ६२० नागरिकांना पाणीपुरवठा सुरू आहे. पनवेल तालुक्यात १० गावे व ८ वाड्यांसाठी ९ टँकरद्वारे १८ हजार ५५३ नागरिकांना पाणीपुरवठा केला जात आहे. कर्जत तालुक्यात ७ गावे व २१ वाड्यांसाठी १३ टँकर, खालापूर तालुक्यात ५ गावे व ९ वाड्यांसाठी टँकर ६, तर माणगाव तालुक्यात ४ गावे व १५ वाड्यांसाठी ५ टँकर कार्यरत आहेत.

याशिवाय अलिबाग तालुक्यात टँकर ३, उरण तालुक्यात ५ वाड्या टँकर १, सुधागड-पाली तालुक्यात २ वाड्या टँकर १, रोहा तालुक्यात ३ गावे टँकर १, पोलादपूर तालुक्यात ९ गावे व १७ वाड्या टँकर ३, म्हसळा तालुक्यात ६ गावे व १ वाडी टँकर ५, तसेच श्रीवर्धन तालुक्यात २ गाव व ६ वाड्यांना टँकर २ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे.नागरिकांना नियमित व सुरळीत पाणीपुरवठा मिळावा यासाठी संबंधित यंत्रणा समन्वयाने कार्यरत असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

# शिवभक्तांसाठी होळीचा माळ येथे तात्पुरत्या रुग्णालयाची सुविधा

**अलिबाग : प्रतिनिधी**

शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या अनुषंगाने ५ व ६ जून या कालावधीमध्ये किल्ले रायगडावर विविध ठिकाणी आरोग्य पथके २४ तास कार्यरत असतील. प्रत्येक पथकासोबत रुग्णांना संदर्भित करण्यासाठी झोळी स्ट्रेचर आवश्यक त्या प्रमाणात उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. गडावरील रोप वे स्थानक, राजसदर, होळीचा माळ, जगदीश्वर मंदिर व गडाखालील रोप वे स्थानक येथे तज्ज्ञ वैद्यकिय पथके २४ तास कार्यरत असणार आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्र पाचाड येथे ५ अतिदक्षता खाटा (आय.सी.यु) व ३० सर्वसाधारण खाटांचे सुसज्ज रुग्णालय ऑक्सिजन सुविधेसह कार्यरत असणार आहे. सर्व वैद्यकिय पथकांकडे पुरेशा प्रमाणात औषधसाठा व वैद्यकिय उपकरणे उपलब्ध करून देण्यात आला आहे.

शिवराज्याभिषेकासाठी किल्ले रायगडावर येणा-या प्रत्येक शिवभक्ताची काळजी घेण्यासाठी जिल्हा परिषद कटिबद्ध असून तशी सज्जता आरोग्य विभागाने ठेवली आहे. त्यामुळे शिवभक्तांनी येउन या सोहळ्याचा आनंद घ्यावा, असे आवाहन रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, उपाध्यक्ष तथा आरोग्य सभापती मधुकर पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मनिषा सातपुते, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्राची नेहुलकर यांनी केले आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र पाचाड, नाणेदरवाजा, रोप वे पायथा, नानेखिंड, ग्रामीण रुग्णालय महाड व उपजिल्हा रुग्णालय माणगांव येथे ६ रुग्णवाहिका या उपलब्ध असतील. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र पाचाड, मागणांव व महाड मार्गावर १०२ क्रमांकांच्या ७ रुग्णवाहिका तैनात करण्यात येणार आहेत. अशा एकुण १५ रुग्णवाहिका कार्यरत राहणार आहेत.कोणत्याही प्रकारची आपत्कालिन घटना घडल्यास नागरिकांची उपचारांअभावी गैरसोय होउ नये यासाठी ४ शासकीय व १० खासगी रुग्णालयांमध्ये एकूण २६० खाटा राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

## नढाळ येथील पंचायतन मंदिरात दानपेटी फोडली

**खोपोली: प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील नढाळ येथील प्रसिद्ध पंचायतन मंदीरात चोरट्याने दानपेटी फोडून अंदाजे वीस हजार रुपये रोख रक्कम चोरून नेल्याची घटना बुधवार रात्री घडली आहे.

नढाळ येथे जे.एम.म्हात्रे संस्थेचे पंचायतन मंदीरा मधील भवानी माता मंदीर येथिल दानपेटी बुधवारी दुपारी अज्ञात चोरट्यांने उचकटुन दानपेटीमधील रोख रक्कम चोरी केली. या अगोदर देखील मंदिरात रात्रीच्या वेळेस दानपेटी फोडण्यात आली होती. सुरक्षा रक्षक ,सीसीटीव्ही असताना देखील चोरट्याने दानपेटी फोडल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

याबाबत खालापूर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक शिवाजी जुंदरे करीत आहे**त.**



## खोपोलीत पावसाच्या आगमनाची चाहूल

**खोपोली :** शहरात गुरुवारी सायंकाळच्या सुमारास आभाळात काळे ढग दाटन आले होते, त्यामुळे सर्वत्र अंधार पसरला होता, उकाड्याने त्रस्त झालेल्या खोपोलीकरांना हा दिलासा मिळाल्याचे आनंद होता, परंतु प्रसार माध्यमांवर शनिवारपासून पाऊस सुरू होणार असे वृत्त सुरू होते. त्यामुळे आणखीन दोन दिवस पावसाची प्रतीक्षा करावी लागेल, काही वेळ अंधार पसरल्याने गुरुवारी भरणाऱ्या साप्ताहिक बाजारातील व्यापारांमध्ये चिंतेचे वातावरण दिसून आले.

# मध्य रेल्वेच्या मुंबई विभागाने दोन महिन्यांत विनातिकीट प्रवाशांकडून केला ३०.१३ कोटी रुपये दंड वसूल

**रोहा : प्रतिनिधी**

आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी मध्य रेल्वेच्या मुंबई विभागाच्या तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांनी एप्रिल ते मे २०२६ (आर्थिक वर्ष २०२६-२७) या कालावधीत विनातिकीट प्रवासाच्या ४.३० लाख प्रकरणांमधून ३०.१३ कोटी रुपयांची उल्लेखनीय तिकीट तपासणी मिळकत नोंदवली आहे. मागील वर्षी याच कालावधीत २.७५ लाख प्रकरणांमधून वसूल केलेल्या १२.०२ कोटी रुपयांच्या तुलनेत हे उत्पन्नात १५०% पेक्षा जास्त आणि प्रकरणांच्या संख्येत ५६% पेक्षा जास्त वाढ दर्शवते.



मे महिन्यात तिकीटविरहित प्रवासाच्या २.०२ लाख प्रकरणांमधून दंड म्हणून १४.०० कोटी रुपये वसूल करण्यात आले. मागील वर्षी याच कालावधीत १.३० लाख प्रकरणांमधून ५.९५ कोटी रुपये वसूल करण्यात आले होते. यावरून वसुलीत १३५% पेक्षा जास्त आणि प्रकरणांच्या संख्येत ५६% पेक्षा जास्त वाढ झाल्याचे दिसून येते.

आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी मेल आणि एक्सप्रेस गाड्या तसेच उपनगरीय गाड्यांमध्ये, विशेषतः द्वितीय श्रेणीच्या डब्यांमध्ये वारंवार तिकीट तपासणी मोहीम प्रभावी ठरली आहे. एप्रिल ते मे २०२६ या कालावधीत ३.०४ लाख प्रकरणे उघडकीस आली, जी मागील वर्षीच्या याच कालावधीतील २.०२ लाख प्रकरणांपेक्षा ५०% पेक्षा जास्त वाढ दर्शवते.

एप्रिल ते मे २०२६ या कालावधीत दंड म्हणून २४.७७ कोटी रुपये वसूल करण्यात आले, जे मागील वर्षीच्या याच कालावधीतील १०.१२ कोटी रुपयांच्या तुलनेत जवळपास १४५% वाढ दर्शवते.

मे महिन्यात तिकीटविरहित प्रवासाच्या १.४६ लाख प्रकरणांमधून दंड म्हणून ११.७१ कोटी रुपये वसूल करण्यात आले, जे मागील वर्षीच्या याच कालावधीतील ९७,०४६ प्रकरणांमधून वसूल केलेल्या ५.०९ कोटी रुपयांच्या तुलनेत जास्त आहे. हे उत्पन्नात १३०% पेक्षा जास्त आणि प्रकरणांच्या संख्येत ५०% पेक्षा जास्त वाढ दर्शवते.

.मे महिन्यात वातानुकूलित उपनगरी ट्रेनमध्ये वातानुकूलित प्रवास करण्याच्या १३,२२५ प्रकरणांमधून दंड म्हणून ४१.३१ लाख रुपये वसूल करण्यात आले. मागील वर्षी याच कालावधीत १०,६६१ प्रकरणांमधून ३४.१५ लाख रुपये वसूल करण्यात आले होते. यावरून महसूलात जवळपास २१% आणि प्रकरणांच्या संख्येत २४% पेक्षा जास्त वाढ झाल्याचे दिसून येते.

मध्य रेल्वे प्रवाशांना आवाहन करत आहे की, गैरसोय आणि दंड टाळण्यासाठी योग्य आणि वैध तिकीट खरेदी करून सन्मानाने आणि जबाबदारीने प्रवास करावा. रेल्वे विनातिकीट प्रवासाबाबतच्या आपल्या शून्य-सहिष्णुता धोरणाचा पुनरुच्चार करते आणि प्रवाशांना आरामदायक व सन्मानजनक प्रवास मिळावा यासाठी कटिबद्ध आहे.

# तळा तालुक्यात शेतीच्या मशागतीच्या कामांना वेग

## कोणते पीक आणि बियाणे घ्यावे याचे नियोजन

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यात पावसाची चाहूल लागत आहे .हे पक्षी व निसर्ग यांच्यातील बदलाने शेतकरी अंदाज वर्तवित असून हवामानखात्याने वर्तवलेल्या अंदाजाने बळीराजा शेतीच्या मशागती बरोबरच आपल्या शेतात कोणकोणती पिके भातशेतीला पुरक होईल याचेही नियोजन करत आहेत

भातशेतीचे बांध बंदीस्त,कुंपण घालणे,धुळवडवाफे तयार करणे,घराच्या शेजारील परसावात भाजीपाल्याची लागवड करण्यासाठी सुरक्षेच्या दृष्टीने कुंपण घालून आळी तयार करून ठेवणे.पावसाळ्यात शेतीत पाणी अधिक झाल्यास त्याचा निचरा कसा होईल .ज्या शेतीत पाणी राहात नाही त्या शेतात पाणी कसे थांबविता येईल या दृष्टीने नियोजन व कामे शेतकरी करत आहे.

तालुक्यातील शेतीही डोंगराळ भागातील अधिक असल्याने शेतीचे जंगली माकडे, डुक्कर इत्यादी प्राण्यांपासून नुकसान होत असते त्यादृष्टीने उपाय कसे करता येतील हे नियोजन ही महत्वाचे आहे.

तालुक्यात काही भागात आजही भाजीपाला लागवड केलेली आहे.त्यातून चांगले उत्पन्नही मिळत आहे.तालुक्यातील शेतकऱ्यांशी संवाद साधला असता ते म्हणाले की या उन्हाळ्याच्या दिवसात आपल्या भागात ज्याठिकाणी पाणी आहे.त्याठिकाणी माठाची भाजी व इतर पालेभाज्या व मिरचीचे पिक चांगले उत्पन्न देत असते.त्या दृष्टीने थोड्या खर्चात व कमी

मेहनतीने हे पिक आम्ही स्वतः घेतले चांगले उत्पन्न मिळाले आहे.त्याच बरोबर आता मान्सूनचा पाऊस थोड्याच काळावधीत सुरू होईल.तेव्हा भातशेतीचे बांध व मशागत सध्या चालू असून या भात शेतीबरोबर शेताच्या बांधावर भेंडीची लागवड ,टॉमेटो ,मिरची इत्यादी नियोजना प्रमाणे लागवड करून चांगल्या प्रकारे पिक घेणार आहे.मागील वर्षी ही असे प्रयोग यशस्वी झाले आहेत.अशा प्रकारे चांगले उत्पन्न मिळेल असा अंदाज सांगितला आहे.त्याच बरोबर आपल्या शेतीत चांगले उत्पन्न मिळते.



**पान १ वरुन**

## रायगडावर आजपासून शिवराज्याभिषेकाचा लोकोत्सव

रात्री ८ वाजता राजसदर येथे ‘जागर शिवशौर्याचा, स्वराज्याच्या इतिहासाचा’ हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून रात्री ९ वाजता शिरकाई देवी मंदिरात पारंपरिक गोंधळ होणार आहे. रात्री ९.३० वाजता जगदीश्वर मंदिर येथे वारकरी संप्रदायाकडून कीर्तन व भजनाचा कार्यक्रम सादर केला जाईल.

शनिवारी राज्याभिषेक दिनाच्या मुख्य कार्यक्रमाला सकाळी ७ वाजता नगारखान्यात पारंपरिक वाद्यांच्या गजरात प्रारंभ होईल. सकाळी ७.३० वाजता राजसदर येथे शाहिरी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ९.३० वाजता छत्रपती शिवाजी महाराजांच्या पालखीचे राजसदरावर आगमन होईल. त्यानंतर युवराज संभाजीराजे छत्रपती व शहाजीराजे छत्रपती यांचे आगमन होणार आहे. सकाळी १० वाजता युवराज संभाजीराजे छत्रपती यांच्या हस्ते शिवाजी महाराजांच्या उत्सवमूर्तीचा अभिषेक करण्यात येईल. सकाळी १०.३० वाजता युवराज संभाजीराजे छत्रपती शिवभक्तांना मार्गदर्शन करतील. सकाळी ११ वाजता शिवराज्याभिषेक पालखी सोहळ्यास प्रारंभ होऊन दुपारी १२ वाजता पालखी जगदीश्वर मंदिरात पोहचेल. त्यानंतर दुपारी १२.१५ वाजता वारकरी संप्रदायाला पंढरपूर वारीसाठी मानाचा ध्वज प्रदान करण्यात येईल. दुपारी १२.२५ वा. छत्रपती शिवाजी महाराजांना सामूहिक अभिवादन करून दोन दिवसीय सोहळ्याची सांगता करण्यात येईल. शौर्य, इतिहास, संस्कृती व भक्तीचा अद्वितीय संगम अनुभवण्याची संधी या सोहळ्यानिमित्ताने उपलब्ध होत असून राज्यभरातील शिवप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सोहळ्याची शोभा वाढवावी, असे आवाहन अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समितीच्या वतीने प्रशांत दरेकर यांनी केले आहे.

# कोकण भवनात ज्येष्ठ नागरिक महामंडळाचे कार्यालय सुरू

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

ज्येष्ठ नागरिकांना त्यांचा वृद्धापकाळ सुखाचा आणि सन्मानाचा घालवता यावा, यासाठी राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत स्थापन करण्यात आलेल्या ज्येष्ठ नागरिक महामंडळाचे कार्यालय कोकण भवन येथे कार्यान्वित करण्यात आले आहे. अशी माहिती ज्येष्ठ नागरिक महामंडळाचे सहव्यवस्थापक यांनी दिली आहे.

या महामंडळाच्या माध्यमातून ज्येष्ठांचे सामाजिक जीवन सुसह्य करणे, त्यांचे शारीरिक व मानसिक आरोग्य सुस्थितीत राखणे, आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, तसेच त्यांना हक्काचे विमा संरक्षण आणि वैद्यकीय मदत मिळवून देणे शक्य होणार आहे. याशिवाय वृद्धापकाळात होणारी छळवणूक, जीविताचे व मालमत्तेचे संरक्षण आणि निवारा यांसारख्या अत्यंत संवेदनशील बाबींवरही हे महामंडळ विशेष लक्ष केंद्रित करणार आहे.

महाराष्ट्रातील ज्येष्ठ नागरिकांच्या कल्याणासाठी या स्वतंत्र महामंडळाची घोषणा करण्यात आली होती. त्यानुसार आता नवी मुंबईतील सी.बी.डी. बेलापूर येथील कोकण भवन इमारतीमधील ६ व्या मजल्यावर, रूम नंबर ६१९ मधील प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण (मुंबई विभाग) यांच्या कार्यालयात हे नवीन कार्यालय सुरू करण्यात आले आहे.

पनवेलला पाणीपुरवठा करणाऱ्या

# देहरंग धरणाची उंची वाढवणार

## पनवेल महापालिकेतर्फे प्राथमिक आराखडा तयार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहराची पाण्याची गरज लक्षात घेऊन देहरंग धरणाची उंची वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. धरणाची उंची सध्याच्या पातळीपेक्षा २० मीटरने वाढविल्यास पाणी साठवण क्षमतेत मोठी वाढ होऊन शहराचा दीर्घकालीन पाणीप्रश्न मार्गी लागू शकतो, असा अंदाज पनवेल महापालिका प्रशासनाने व्यक्त केला आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी गाव, वाड्यांतील नागरिकांचे पुनर्वसन आणि १,२०० कोटी रुपयांचा निधी आवश्यक आहे.



(संग्रहित छायाचित्र)

महापालिकेच्या पाणीपुरवठा व बांधकाम विभागाने यासंदर्भात प्राथमिक आराखडा तयार केला आहे. प्रस्तावित विस्तारानुसार मुख्य बंधाऱ्याची उंची २० मीटरने वाढविण्यात येणार असून त्यामुळे धरणातून सध्या उपलब्ध असलेल्या पाणीपुरवठ्याच्या तुलनेत जवळपास दहापट अधिक, म्हणजेच प्रतिदिन १३१ एमएलडी पाणी उपलब्ध होऊ शकते. धरण विस्तारासाठी अंदाजे १,००० कोटी रुपये खर्च अपेक्षित असून धरणातील पाणी शहरापर्यंत पोहोचविण्यासाठी स्वतंत्र जलवाहिनी योजनेसाठी आणखी २०० कोटी रुपयांची आवश्यकता भासणार आहे.

सध्या देहरंग धरणाचे क्षेत्रफळ १५ हेक्टर असून त्याची साठवण क्षमता ३.५७ दशलक्ष घनमीटर आहे. विस्तारानंतर ही क्षमता ३७.८१ दशलक्ष घनमीटरपर्यंत वाढू शकते. त्यासाठी अतिरिक्त २१४ हेक्टर जमीन संपादित करावी लागणार आहे. प्रस्तावित विस्तारित जलक्षेत्रामुळे टावरेवाडी, मालडुंगे तसेच परिसरातील काही आदिवासी वाड्या आणि शेतघरे प्रभावित होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुनर्वसन हा प्रकल्पातील महत्त्वाचा घटक ठरणार आहे.

माथेरान डोंगररांगालगत असलेल्या या परिसरात मोठ्या प्रमाणावर पर्जन्यवृष्टी होत असल्याने धरण विस्ताराची संकल्पना व्यवहार्य मानली जात आहे. या प्रकल्पासाठी 'नागरी आव्हान निधी' तसेच जागतिक बँकेच्या आर्थिक साहाय्याचा पर्यायही विचाराधीन आहे.

धरण विस्ताराचा प्राथमिक प्रस्ताव पनवेल महापालिकेच्या आगामी सर्वसाधारण सभेत (महासभा) सादर केला जाणार आहे. मंजूर ठराव राज्याच्या नगरविकास विभागाकडे पाठविण्यात येणार आहे. त्यानंतर निधी मिळविण्याच्या प्रक्रियेला गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मात्र स्थानिक स्वराज्य संस्थेची विधानपरिषद निवडणूकीची आचारसंहिता सुरू असल्याने जून अखेरीस ही महासभा होण्याची चिन्हे आहेत.

मुख्यमंत्र्यांनी पनवेल शहराचा वाढता विस्तार आणि सद्यस्थितीतील पाण्याचा तुटवडा लक्षात घेऊन देहरंग धरणाची उंची वाढविणे आणि विस्तारित धरण प्रकल्पाला तातडीने मंजुरी देणे आवश्यक आहे. हा प्रकल्प मुख्यमंत्री वॉर रूमच्या देखरेखीखाली घेतल्यास धरण विस्ताराच्या कामाला खऱ्या अर्थाने गती मिळू शकेल आणि पुढील तीन वर्षांत या धरणातून प्रत्यक्ष पाणी पनवेलकरांना उपलब्ध होऊ शकेल.

# महापौर नितीन पाटील यांनी प्रभाग १४ मधील पावसाळापूर्व कामांची केली पाहणी

**पनवेल : प्रतिनिधी**



पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील यांनी गुरुवारी (दि. ४) प्रभाग क्रमांक १४ मधील विविध ठिकाणी नालेसफाई व पावसाळ्यापूर्वी सुरू असलेल्या कामांची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी परिसरातील नागरिकांच्या समस्या जाणून घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील सखल भागांमध्ये पाणी साचू नये, नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये तसेच नाल्यांमधील गाळ व अडथळे तातडीने दूर करण्यात यावेत, यासाठी महापौरांनी अधिकाऱ्यांना निर्देश दिले. विविध ठिकाणी सुरू असलेल्या नालेसफाईच्या कामांचा आढावा घेत कामांची गुणवत्ता आणि गती यावरही त्यांनी भर दिला.

प्रभागातील विकासकामे वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण व्हावीत यासाठी भाजपाचे चारही उमेदवार सातत्याने पाठपुरावा करत येत असून नागरिकांच्या सुरक्षिततेला आणि सुविधांना सर्वोच्च प्राधान्य दिले जात असल्याचे महापौर नितीन पाटील यांनी यावेळी सांगितले.

या पाहणी दौऱ्यावेळी पनवेल भाजपा ओबीसी सेल अध्यक्ष सतिश पाटील, माजी नगरसेवक गणपत म्हात्रे, माजी नगरसेविका हेमलता म्हात्रे, भाजपा पनवेल मंडल सरचिटणीस रुपेश नागवेकर, उपाध्यक्ष अतुल भगत, प्रभाग अध्यक्ष गणेश म्हात्रे, भाजपा नेते शैलेश म्हात्रे, रोहीत आठवणे, रुपेश आंबोलकर, अभिजित जाधव, सचिन गमरे, युवा मोर्चा अध्यक्ष कुणाल पाटील व स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते, महानगरपालिका अधिकारी तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. भाजपा उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष श्री. मयुरेश नेतकर यांनी सांगितले कि, प्रभाग १४ मधील नागरिकांना पावसाळ्यात कोणत्याही अडचणींचा सामना करावा लागू नये यासाठी महापौर नितीनभाई पाटील यांच्या नेतृत्वाखाली सातत्याने पाठपुरावा केला जात आहे. प्रत्येक प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी भारतीय जनता पक्ष सदैव जनतेसोबत उभा आहे.

# पनवेल वाहतूक पोलिसांच्या तत्परतेमुळे अपघातग्रस्तांना वेळेत उपचार



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहराजवळील शिवशंभू सिग्नल येथे कर्तव्य बजावत असताना पोलीस हवालदार अमीर मुलाणी व पोलीस शिपाई सुरेश जोंजाळ यांना वाहनचालक नागरिकामार्फत गाढी नदी पुलावर मोटरसायकलचा अपघात झाल्याची माहिती मिळाली. अपघातात दोन व्यक्ती जखमी होऊन रस्त्यावर पडल्याचे समजताच दोन्ही पोलीस अंमलदारांनी कोणताही विलंब न करता तात्काळ घटनास्थळी धाव घेतली.

घटनास्थळी पोहोचल्यावर जखमी व्यक्ती रस्त्यावर पडलेल्या अवस्थेत आढळून आल्या. त्यांनी नागरिकांच्या मदतीने जखमींना सुरक्षितपणे उचलून ॲम्बुलन्सची प्रतीक्षा न करता तेथून जाणाऱ्या ऑटो रिक्षामध्ये बसविले. व स्वतः जखमींसोबत उपजिल्हा रुग्णालय, पनवेल येथे गेले व त्यांना तातडीने उपचारासाठी दाखल केले.व पुढील कारवाईसाठी पनवेल शहर पोलीस स्टेशन यांना माहिती देण्यात आली.

दरम्यान, घटनेची माहिती पनवेल शहर वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांना तात्काळ देण्यात आली. त्यांनी घटनास्थळी अतिरिक्त अंमलदार पाठवून वाहतूक सुरळीत ठेवण्याच्या सूचना दिल्या.

# पनवेल महानगरपालिकेचे कार्य अभिमानास्पद : मुकेश सारवान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सफाई कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी पनवेल महानगरपालिका राबवत असलेले कार्य अभिमानास्पद असून इतर महापालिकांसाठी आदर्शवत आहे. महापालिकेने राबविलेली विविध कल्याणकारी धोरणे आणि उपक्रम राज्यातील इतर महापालिकांनी अवलंबावेत, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे उपाध्यक्ष मुकेश सारवान यांनी केले. सफाई कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांचा आढावा घेण्यासाठी तसेच शासनाच्या कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीची माहिती जाणून घेण्यासाठी मा.श्री. सारवान यांनी गुरुवार, दि. ०४ जून रोजी पनवेल महानगरपालिकेस भेट दिली. यावेळी आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते.



यावेळी महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे, सभागृह नेते प्रकाश बिनेदार, स्थायी समिती सभापती बाबन मुकादम, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त वैभव विधाते, प्रसेनजित कारलेकर, मंगला माळवे, स्वरूप खारगे, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखापरीक्षक निलेश नलावडे, सहाय्यक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी डॉ. रुपाली माने, शहर अभियंता संजय कटेकर तसेच महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. याशिवाय सफाई कर्मचारी संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

बैठकीत परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे यांनी शासन निर्णयातील तरतुदींनुसार सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसा हक्क नियुक्तीच्या प्रकरणांबाबत माहिती दिली. तसेच सफाई कामगारांची मंजूर पदे, भरलेली पदे व रिक्त पदे यांचा तपशील सादर केला. यासोबतच सफाई कर्मचाऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती सादरीकरणाद्वारे देण्यात आली. उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी सफाई कर्मचाऱ्यांसाठी आयोजित करण्यात येणारे प्रशिक्षण कार्यक्रम, आरोग्य तपासणी शिबिरे, विविध स्पर्धा तसेच देण्यात येणारे भत्ते याबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजनेअंतर्गत २५ वर्षे किंवा त्याहून अधिक सेवा पूर्ण केलेल्या सफाई कामगारांना पंतप्रधान आवास योजनेमार्फत ५४ मोफत मालकी हक्काच्या सदनिका उपलब्ध करून देण्याच्या उपक्रमाची सद्यस्थिती शहर अभियंता संजय कटेकर यांनी मांडली.

यावेळी आयोगाचे उपाध्यक्ष मुकेश सारवान यांनी पनवेल महानगरपालिकेने सफाई कर्मचाऱ्यांच्या सामाजिक, आर्थिक व आरोग्यविषयक उन्नतीसाठी राबविलेल्या विविध उपक्रमांचे कौतुक केले. तसेच सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्या प्राधान्याने सोडवून त्यांच्या जीवनमानात अधिक सुधारणा घडवून आणण्यासाठी पालिका करत असलेल्या कामाचा आढावा घेतला. या बैठकीत सफाई कर्मचारी संघटनांच्या उपस्थित प्रतिनिधींनी देखील सफाई कर्मचाऱ्यांच्या बाबत पालिकेचे सकारात्मक व मदतीचे धोरण असल्याची माहीती दिली. सफाई कर्मचाऱ्यांच्या संघटना देखील कौतुक करतात म्हणजे पालिकेचे काम नक्कीच भूषणावह आहे अशा शब्दांत श्री. सारवान यांनी समाधान व्यक्त केले. उपायुक्त स्वरूप खारगे यांनी बैठकिस उपस्थित सर्वांचे आभार मानले.



**पनवेल :** विशेष सघन पुनरिक्षण (Special Intensive Revision – SIR) कार्यक्रमाच्या अनुषंगाने मंडळनिहाय आढावा बैठक पनवेल विधानसभा मतदारसंघाचे एसआयआर प्रमुख माजी सभागहनेते नगरसेवक परेश ठाकूर यांनी घेतली. या बैठकीत मतदार यादी पुनरिक्षणाची सद्यस्थिती, प्रगती, अडचणी तसेच आगामी कार्यवाहीबाबत सविस्तर चर्चा केली. मतदार नोंदणी प्रक्रियेत अचूकता, पारदर्शकता आणि वेळेचे नियोजन सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक सूचना व मार्गदर्शन केले.

# कळंबोलीत महापालिका कर्मचाऱ्यांना शिवीगाळ करणाऱ्या आरोपीला अटक

**पनवेल : वार्ताहर**

शहरात स्वच्छता राखण्यासाठी आणि उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांना शिस्त लावण्यासाठी प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला आहे. आज, गुरुवार दिनांक ४ जून २०२६ रोजी कळंबोली प्रभाग क्र. १० मधील 'केएलई (KLE) कॉलेज कॉर्नर' येथे उघड्यावर कचरा टाकणाऱ्या एका बेजबाबदार नागरिकावर दंडात्मक कारवाई करण्यात आली. मात्र, कारवाई दरम्यान या व्यक्तीने पालिका कर्मचाऱ्यांना वाईट शब्द वापरून हुज्जत घातल्याने त्याला थेट पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, मुख्य आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे यांच्या मार्गदर्शनानुसार कचरा टाकणाऱ्यांवर लक्ष ठेवण्यासाठी आणि कारवाई करण्यासाठी पालिकेचे पथक तैनात होते. दरम्यान, केएलई कॉलेज कॉर्नर परिसरामध्ये कचरा टाकत असताना संबंधित व्यक्तीला पथकाने रंगेहात पकडले आणि नियमानुसार त्याला फाईन (दंड) ठोठावला. दंडाची कारवाई करत असताना संबंधित व्यक्तीने प्रशासकीय कामात अडथळा आणत उपस्थित कर्मचाऱ्यांशी वाद घातला आणि अत्यंत वाईट शब्द (शिवीगाळ) वापरले. शासकीय कर्मचाऱ्यांशी गैरवर्तन केल्याप्रकरणी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून स्वच्छता पथकाने तात्काळ पोलिसांशी संपर्क साधून त्या व्यक्तीला पोलिसांच्या स्वाधीन केले. या धडक कारवाई दरम्यान स्वच्छता निरीक्षक दिग्नेश भोईर, साईगणेश सुपरवायझर रसूल बागवान उपस्थित होते.

माजी सरपंच नंदकुमार म्हात्रे यांच्या पाठपुराव्याने

# रोहिंजन परिसरातील गटारांची साफसफाई

**पनवेल : प्रतिनिधी**

रोहिंजन ग्रामपंचायतीचे माजी सरपंच आणि पनवेल तालुका ओबीसी सेलचे अध्यक्ष नंदकुमार म्हात्रे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याने प्रभाग एकमधील रोहिंजन गावलगत विजय पाटील यांच्या घराजवळील व टुडे आनंदम सोसायटी जवळील गटारांची साफसफाई करण्यात आली.

यावेळी माजी सरपंच नंदकुमार म्हात्रे, महानगरपालिकेचे कर्मचारी, तसेच सुरेश पोरजी, विजय पाटील, नेहाल ठाकूर, उमेश मढवी व इतर ग्रामस्थ उपस्थित होते. म्हात्रे यांच्या प्रयत्नांना यश येत महानगरपालिका प्रशासनाने तातडीने कार्यवाही करत संबंधित गटारांची साफसफाई केली.

यामुळे परिसरातील साचलेल्या पाण्याचा निचरा होण्यास मदत झाली असून नागरिकांना दिलासा मिळाला आहे. विशेषतः पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर गटारांची स्वच्छता झाल्याने डासांची उत्पत्ती, दुर्गंधी तसेच आरोग्यविषयक समस्या कमी होण्यास मदत होणार आहे.

याप्रसंगी नंदकुमार म्हात्रे यांनी सांगितले की, "परिसरातील नागरिकांच्या मूलभूत सुविधांशी संबंधित प्रश्न सोडविण्यासाठी आपण नेहमीच कटिबद्ध आहोत. नागरिकांच्या अडचणी प्रशासनापर्यंत पोहोचवून त्यांचे निराकरण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू राहतील.

"रोहिंजन परिसरातील स्वच्छता, आरोग्य आणि नागरिकांच्या सोयीसाठी अशा प्रकारच्या कामांना यापुढेही प्राधान्य देण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.



# विचुंबे गावाजवळ गाढी नदीला जलपर्णीचा विळखा

**पनवेल : वार्ताहर**

माथेरानच्या निसर्गरम्य आणि अथांग डोंगररांगांमधून उगम पावून, विविध गावे आणि परिसराला समृद्ध करत पुढे अरबी समुद्राला जाऊन मिळणारी गाढी नदी सध्या एका अत्यंत गंभीर आणि चिंताजनक समस्येचा सामना करत आहे. पनवेल जवळील विचुंबे गावाच्या हद्दीतून वाहणाऱ्या या नदीच्या विस्तीर्ण पात्रावर गेल्या काही दिवसांत मोठ्या प्रमाणावर जलपर्णी पसरली आहे. या जलपर्णीच्या अनिर्बंध साम्राज्यामुळे नदीचे मूळ निसर्गदत्त आणि विहंगम सौंदर्य पूर्णपणे कुरूप झाले आहे. संपूर्ण नदीचे पात्र या हिरव्यागार जलपर्णीने कशाप्रकारे वेढून टाकले आहे. नदीच्या पाण्याचा प्रवाह कुठेही दिसत नसून, संपूर्ण पात्रावर जणू काही एखाद्या मोठ्या मैदानासारखा किंवा गवताळ जमिनीसारखा भास होत आहे.

वास्तविक पाहता, ज्या गावाला किंवा परिसराला नदीचे सान्निध्य लाभते, ते गाव खऱ्या अर्थाने निसर्गाने उधळण केलेले समृद्ध गाव मानले जाते. विचुंबे गावालाही गाढी नदीच्या रूपाने निसर्गाचे असेच एक अद्भूत आणि सुंदर वरदान लाभले आहे. वर्षानुवर्षे ही नदी या भागाची जीवनवाहिनी राहिली आहे. मात्र, सध्या या नदीची झालेली दुरवस्था पाहून पर्यावरणप्रेमी आणि स्थानिक नागरिकांमधून तीव्र हळहळ व्यक्त होत आहे. जलपर्णीच्या या अवाढव्य वाढीमुळे पाण्याचा नैसर्गिक प्रवाह पूर्णपणे संथ झाला आहे. संथ झालेल्या पाण्यात कचरा अडकून पडत असून, यामुळे पाण्याचा दर्जा खालावत चालला आहे.



नदीतील ऑक्सिजनचे प्रमाण कमालीचे कमी होण्याची भीती तज्ज्ञांकडून व्यक्त केली जात असून, याचा थेट आणि घातक फटका नदीतील जलचरांना व माशांना बसत आहे. याशिवाय, संथ पाण्यामुळे परिसरात डासांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर वाढला असून, डेंग्यू, मलेरिया यांसारख्या आजारांची भीती निर्माण झाली आहे, तसेच परिसरात दुर्गंधीचे साम्राज्य पसरत आहे. निसर्गाचे एवढे मोठे वरदान लाभलेल्या या गावाचे आणि नदीचे सौंदर्य अशा प्रकारे प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे नष्ट होऊ देणार नाही, अशी आक्रमक भूमिका ग्रामस्थांनी घेतली आहे.

सध्या उन्हाळा संपून पावसाळा अगदी तोंडावर आला आहे. पावसाळ्यात माथेरानच्या डोंगरावरून येणाऱ्या पाण्याचा वेग प्रचंड असतो. अशा वेळी जर विचुंबे गावाजवळील नदीच्या पात्रात ही जलपर्णी अशीच साचून राहिली, तर पाण्याचा निचरा होण्यास मोठा अडथळा निर्माण होऊ शकतो. पाण्याचा प्रवाह अडकल्यास नदीचे पाणी विचुंबे आणि आसपासच्या सखल भागात किंवा लोकवस्तीत शिरून पूरसदृश परिस्थिती निर्माण होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. संभाव्य धोका आणि जीवित–वित्तहानी टाळण्यासाठी, तसेच नदीचे मूळ सौंदर्य पूर्ववत करण्यासाठी शासनाने आणि संबंधित यंत्रणेने कोणतीही दिरंगाई न करता युद्धपातळीवर जलपर्णी हटवण्याची मोहीम राबवावी, अशी आग्रही मागणी पर्यावरणप्रेमींकडून केली जात आहे.

## संपादकीय

# पुन्हा बेपर्वाईचे बळी

दिल्लीतील हॉटेलला बुधवारी लागलेल्या आगीत १२ परदेशी नागरिकांसह २१ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर अन्य काहींची प्रकृती चिंताजनक आहे. संबंधित हॉटेलमध्ये अग्निसुरक्षेसह अनेक नियमांचे उल्लंघन करण्यात आल्याचे स्पष्ट झाले असून गुरुवारी बिहारमधील एका हॉस्पिटलच्या आयसीयुमध्ये लागलेल्या आगीत आणखी १५ जणांचा बळी गेला. आगीच्या अशा घटना आपल्याकडे अधुनमधुन घडतच असतात. बहुदा त्या अग्निसुरक्षेच्या नियमांच्या उल्लंघनातून व बेपर्वाईतूनच लागतात. दुर्दैवाची बाब अशी की तरीही खबरदारीसंदर्भात आपण काहीही शिकत नाही.

**दिल्लीतील मालवीय नगरमधील ज्या हॉटेलमध्ये बुधवारी सकाळी आग लागली, त्या हॉटेलमध्ये सहा खोल्यांना परवानगी असताना तिथे दोनाचे पाच मजले करून २५ खोल्या निर्माण करण्यात आल्या होत्या. सहा-सात वर्षांपूर्वी तळमजला व पहिला मजला असे स्वरूप असलेल्या या इमारतीचा बेकायदा विस्तार करून तिथे दोन हॉटेले थाटण्यात आली होती. जवळच्या इस्पितळात उपचार घेणाऱ्या रुग्णांचे नातेवाईक या हॉटेलमध्ये राहात. बुधवारच्या आगीत मृत्यूमुखी पडलेल्या भारतीयांमध्ये एका अग्रवाल कुटुंबातील आठ सदस्यांचा समावेश आहे. कुटुंबातील वयस्कर व्यक्तीवर इस्पितळात उपचार सुरू असल्यामुळे हे कुटुंबीय देशातील निरनिराळ्या शहरांमधून या हॉटेलमध्ये येऊन राहिले होते. गुरुग्राममधील सीए विवेक अग्रवाल यांचे संपूर्ण कुटुंब या आगीत मृत्यूमुखी पडले. इस्पितळानजीकचे हॉटेल म्हणून त्यांनी दाटीवाटीच्या वस्तीतील या हॉटेलची निवड केली असावी. हॉटेलमध्ये अग्निसुरक्षेची काय व्यवस्था आहे याची सर्वसाधारणपणे आपल्यापैकी कुणीच खातरजमा करत नाही. बहुदा एसीतील शॉर्टसर्किटमुळे अकस्मात लागलेल्या आगीत त्यांचे संपूर्ण कुटुंब मृत्यूमुखी पडले. हॉटेलमध्ये तळघरात रेस्टॉरंट व किचन होते. तिथे अनेक सिलेंडरचा साठा होता. परंतु स्फोट झाल्याचे दिसलेले नाही. वरच्या मजल्यांवर जाण्यासाठी संपूर्ण इमारतीत एकच जिना होता. इमारतीतून आत-बाहेर करण्यासाठी प्रवेशद्वारही एकच होते व हॉटेलमधील अनेक खिडक्या कायमस्वरुपी बंद करण्यात आल्या होत्या. सकाळी पावणे नऊच्या सुमारास आग लागल्यानंतर हॉटेलमधील अनेकांनी खिडक्यांमधून खाली उड्या टाकल्या. आसपासच्या नागरिकांनी खाली गाद्या अंथरून उड्या टाकणाऱ्यांना मोठी इजा होणार नाही याची काळजी घेण्याचा प्रयत्न केला. तरीही काहींना गंभीर दुखापत झाली आहे. अग्निशमन दलाच्या गाड्या येण्यातही अरुंद रस्त्यावर मोटारी पार्क केल्यामुळे मोठा अडथळा होता. लोकांनी मोटारी ढकलून दूर करत अग्निशमन दलाच्या गाड्यांना वाट करून दिली. या साऱ्यात अर्थातच मोलाचा वेळ वाया गेला. अशी परिस्थिती आपल्या देशात कुठेही उद्भवू शकते हे आपण सारेच जाणतो. एसीमधील शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचे असंख्य वेळा समोर येऊनही एसीच्या नियमित देखभालीची काळजी किती लोक घेतात? एका कुणाची बेपर्वाई अनेकांचे बळी घेण्यास कारणीभूत ठरते. दिल्लीतील हॉटेलचा मालक लवकेश बजाज याच्याविरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल झाला असून पोलिसांनी त्याला अटकही केली आहे. राजधानी दिल्लीत १९९७ साली उपहार चित्रपटगृहात लागलेल्या आगीत ५९ जणांचा मृत्यू झाला होता. त्यानंतरही राजधानीत पंधरा-वीस जणांचे बळी घेणाऱ्या आगीच्या किमान पाच मोठ्या घटना घडल्या आहेत. या घटनेची आता न्यायदंडाधिकाऱ्यांमार्फत चौकशी होणार आहे. बेकायदा बांधकामांविरोधात मोहीमही राबवली जाईल. खेदाची बाब अशी की आगीत काही जणांचा बळी गेल्यानंतरच काही दिवस कारवाईचा हा बडगा उगारला जातो. पुन्हा सारे काही तसेच सुरू राहते. बेपर्वाईत बदल होत नाही.**

# वाढत्या तापमानामुळे जीवसृष्टी अलर्ट मोडवर



झाडे हाच जीवनाचा एकमेव आधार आहे. झाडांचा अंत म्हणजे पृथ्वीवरील जीवनाचा अंत. निसर्गाचा साधा नियम आहे की झाडे आपले रक्षण करतात आणि आपणही त्यांचे रक्षण केले पाहिजे. जर आपण निसर्गाच्या संरक्षणासाठी एक टक्का जरी योगदान दिले, तरी निसर्ग आपल्याला १०० टक्के समृद्धी परत देतो. कोरोना काळात आपण सर्वांनी पाहिले की, जेव्हा निसर्गात मानवी हस्तक्षेप थांबला, तेव्हा निसर्ग स्वतःला झपाट्याने समृद्ध करत होता. आज ही एक विडंबनाच आहे की, ते निस्वार्थ, समृद्ध झाड, ज्याने अनेक दशके आईप्रमाणे आपल्या कुशीत सावली देऊन उन्हापासून आपले रक्षण केले, आपल्याला फळे आणि फुले दिली, पक्ष्यांना आश्रय दिला, पावसाळ्यात जमिनीची धूप रोखली, मानवांसाठी विषारी असलेला कार्बन डायऑक्साइड शोषून आपल्याला जीवनदायी ऑक्सिजन दिला. वातावरणातील आर्द्रता आणि तापमान नियंत्रित करून नैसर्गिक संसाधने समृद्ध करण्यात त्याने महत्त्वाची भूमिका बजावली. आज, तेच झाड तोडताना लोकांना कोणताही पश्चात्ताप वाटत नाही, जेव्हाकि त्याचे आपल्या संपूर्ण जीवनावर आणि आरोग्यावर गंभीर परिणाम होतात.

आज आपण सर्वजण बदलत्या नैसर्गिक पर्यावरणाचे परिणाम भोगत आहोत. स्वार्थी लोकांच्या चुकीच्या धोरणांनी संपूर्ण पर्यावरणाला विषारी बनवले आहे. नैसर्गिक संसाधनांचे अतिशोषण आणि जंगलतोडीमुळे पृथ्वीचे तापमान वाढले आहे, ज्यामुळे नैसर्गिक आपत्ती आणि रोगांमध्ये झपाट्याने वाढ होत आहे. प्रदूषण सतत वाढत आहे, सिमेंट रस्ते भट्ट्यांसारखे तापतात आणि भूजल पातळी झपाट्याने कमी होत आहे. अन्नधान्यामधील हानिकारक रसायनांचे सतत वाढणारे प्रमाण लोकांना मृत्यूच्या दारात ढकलत आहे. दहा-पंधरा वर्षांपूर्वीपर्यंत, जेव्हा मुले उन्हात फिरायची आणि खेळायची, तेव्हा फक्त उष्णता जाणवायची. खेळताना झाडाच्या सावलीत बसले की थंड वाटायचे. पण आता, हा सूर्यप्रकाश विषारी वाटू लागला आहे; तो केवळ शरीर तापवत नाही, तर उकळी आणून माणसाला आजारीही पाडतो. शहरांच्या काँक्रीटच्या जंगलात, दाट सावली देणारी झाडे पाहणे दुर्मिळ होत चालले आहे.

उष्णतेच्या लाटांमुळे होणाऱ्या मृत्यूंची संख्या वर्षानुवर्षे वाढत आहे आणि याचा सर्वाधिक फटका गरीब, वृद्ध, मुले आणि असंघटित कामगारांना बसतो, कारण त्यांचा ह्या उन्हात उदरनिर्वाहाचा संघर्ष विशेषतः वेदनादायी असतो. सीईईडब्ल्यूनुसार, बांधकाम कामगार, गिग वर्कर्स आणि झोपडपट्टीत राहणारे लोक यांसारखे असुरक्षित गट उष्णतेच्या ताणास सर्वाधिक बळी पडतात. या उष्णतेत त्यांचे उत्पन्न आणि उत्पादकता दोन्ही घटतात. उष्णतेच्या लाटांमुळे २०३० पर्यंत जीडीपीमध्ये ४.५ टक्क्यांपर्यंत संभाव्य घट होण्याची शक्यता आहे, ज्यामुळे पिकांचे नुकसान आणि अन्नसुरक्षा धोक्यात येईल. 'द लॅन्सेट' मध्ये प्रकाशित झालेल्या २०२४ च्या एका अभ्यासानुसार उष्णतेच्या लाटांदरम्यान कार्यक्षमता कमी झाल्यामुळे दरवर्षी अंदाजे १९४ अब्ज डॉलर्सच्या उत्पन्नाचे नुकसान होते. या शतकाच्या अखेरीस संपूर्ण भारतातील उन्हाळ्यातील उष्णतेच्या लाटांमध्ये ३०० ते ४०० टयांनी वाढ होऊ शकते.

उन्हाळ्यात भूजल पातळीत सतत घट होत असल्यामुळे अनेक गावकऱ्यांना आणि दुर्गम भागातील रहिवाशांना पाण्यासाठी लांबचा प्रवास करावा लागतो. या समस्येशी संबंधित व्हिडिओ सोशल मीडियावर वारंवार व्हायरल होतात, ज्यात लहान मुलांपासून ते वृद्ध महिलांपर्यंत सर्वजण थोड्याशा पाण्यासाठी दररोज अनेक किलोमीटर चालताना दिसतात. आपला जीव धोक्यात घालून ते घागरींमध्ये दूषित पाणी गोळा करण्यासाठी ५०-६० फूट खोल खड्ड्यांमध्ये उतरतात. पाण्यासाठीचा हा संघर्ष आणि असहाय्यता पाहून मन हेलावून जाते. निसर्गाने सर्वांना स्वच्छ पाणी, हवा आणि पौष्टिक अन्न मिळवण्याचा समान हक्क दिले आहे, परंतु स्वार्थी मानवाने निसर्गाचा समतोल बिघडवून सर्व जीवांना धोका निर्माण केला आहे. जर लोकांची ही अवस्था आहे, तर या वाढत्या तापमानात जंगलातील मुक्या वन्य प्राण्यांची अवस्था किती बिकट असेल.

भौगोलिकदृष्ट्या आपला देश उष्णकटिबंधीय प्रदेश मानला जातो. वाढत्या हरितगृह वायू उत्सर्जनामुळे वातावरणातील उष्णता वाढली आहे, ज्यामुळे तापमानात सातत्याने वाढ होत आहे. नैसर्गिक हिरवळ आणि नैसर्गिक शीतकरण संसाधने झपाट्याने कमी होत आहेत. वेगाने विस्तारणाऱ्या शहरांनी नैसर्गिक भूदृश्यांची जागा काँक्रीट आणि काचेच्या इमारतींनी घेतली आहे. या इमारती दिवसा उष्णता शोषून घेतात आणि रात्री हळूहळू बाहेर सोडतात, ज्यामुळे सूर्यास्तानंतरही शहराचे तापमान कमी होत नाही. विकासासाठी, शहरांच्या आसपासच्या गावांमध्ये सुपीक जमिनीवर, शेतजमिनीवर इमारती बांधल्या जात आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या अन्न आणि कृषी संघटनेनुसार जगभरात दरवर्षी अंदाजे एक कोटी हेक्टर जंगल नष्ट होते, जे दर १२ महिन्यांत आइसलँड किंवा पोर्तुगालच्या क्षेत्राएवढे जंगल तोडण्यासारखे आहे. ग्लोबल फॉरेस्ट वॉचनुसार भारतात शेती, जंगलतोड आणि पायाभूत सुविधांच्या विकासामुळे दरवर्षी १,००,००० हेक्टरपेक्षा जास्त नैसर्गिक जंगल आणि वृक्षाच्छादन नष्ट होते. पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाच्या मते, विकास प्रकल्पांसाठी सरकारी परवानगीने दरवर्षी सुमारे २० ते ३० लाख झाडे तोडली जातात.

भारताने १९९० ते २००० या काळात ३,८४,००० हेक्टर जंगल गमावले, परंतु आता हा आकडा वाढून ६,६८,४०० हेक्टर झाला. ऊर्जा आणि उपयुक्तता खर्चाची तुलना करणाऱ्या युनायटेड किंगडम-स्थित 'युटिलिटी बिडर' या वेबसाइटच्या अहवालानुसार या काळात सरासरी ६,६८,४०० हेक्टर जंगल गमावलेल्यांमध्ये ब्राझील पहिल्या क्रमांकावर आहे. या अहवालात पुढे असे म्हटले आहे की, २०१५ ते २०२० या काळात ब्राझीलने २५,५९,१०० हेक्टर आणि इंडोनेशियाने १८,७६,००० हेक्टर जंगल गमावले असताना, भारताच्या आकडेवारीत लक्षणीय वाढ झाली आहे. 'डाऊन टू अर्थ'नेही हे वृत्त दिले आहे. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी मुंबई आणि अभिमत विद्यापीठ सस्त्रा च्या संशोधकांनी केलेल्या एका नवीन अभ्यासात असे समोर आले आहे की, २०१५ ते २०१९ या काळात देशाच्या वनक्षेत्रात लक्षणीय घट झाली आहे. या वर्षांमध्ये भारताने १८ चौरस किलोमीटर वनक्षेत्र गमावले, तर एक चौरस किलोमीटरची वाढ झाली.

भारत सरकारची मुख्य नोडल एजन्सी असलेल्या प्रेस इन्फॉर्मेशन ब्युरोच्या मते, निव्वळ वार्षिक वनक्षेत्र वाढीच्या बाबतीत भारत जागतिक स्तरावर तिसऱ्या क्रमांकावर कायम आहे. वनक्षेत्राच्या वार्षिक ऱ्हासाचा दर १०.७ दशलक्ष हेक्टर (१९९०-२०००) वरून ४.१२ दशलक्ष हेक्टर (२०१५-२०२५) पर्यंत घसरला आहे.

कितीही वृक्षरोपणाच्या गोष्टी केल्या आपण तरीही शेकडो, हजारो वर्ष जूनी घनदाट जंगले कापल्यावर ती त्याच तुलनेत पुन्हा मिळवणे सहज शक्य आहे? वन्य प्राणी आपल्यापेक्षा श्रेष्ठ आहेत, ते त्यांच्या नैसर्गिक अधिवासांचे जतन आणि संवर्धन करून निसर्गाचे खऱ्या अर्थाने रक्षण करतात. झाडे जंगलांना समृद्ध करतात आणि जंगले शुद्ध पाण्याच्या स्रोतांना समृद्ध करतात. भूजल पातळी सुधारते, शुद्ध ऑक्सिजन समृद्ध होते. तापमान नियंत्रित करण्यास मदत होते. जंगलांमध्ये वन्यजीव भरभराटीस येतात आणि प्राण्यांमधील अन्नसाखळी सुरळीतपणे कार्य करते. वन्यजीव आणि मानव यांच्यातील संघर्ष कमी होतो.

प्रदूषण कमी होते, ज्यामुळे मानवी आरोग्य सुधारते. ऋतूचक्र योग्यरित्या कार्य करते, पिके चांगली येतात आणि नैसर्गिक आपत्ती कमी होतात. रोगराई कमी होते, प्रत्येक नागरिकासाठी अन्नसुरक्षेचा पाया मजबूत करण्यास मदत मिळते. मानवी गरजा पुरेशा प्रमाणात पूर्ण होतात. श्रीमंत आणि गरीब यांच्यातील दरी कमी करण्यास मदत मिळते. महागाई नियंत्रणात ठेवण्यास मदत होते, देशात समृद्धी नांदते आणि मग देशाचा खऱ्या अर्थाने विकास होतो.

**-डॉ. प्रितम गेडाम**



## बदलते तंत्रज्ञान

# मेड इन इंडिया स्मार्टफोन निर्मितीला सरकारकडून चालना

भारताला इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन क्षेत्रात अधिक आत्मनिर्भर बनवण्यासाठी केंद्र सरकार मोठे पाऊल उचलण्याच्या तयारीत आहे. देशातच स्मार्टफोनसाठी लागणारे महत्त्वाचे सुटे भाग (कॉम्पोनंट्स) तयार व्हावेत यासाठी सरकार प्रोडक्शन लिंक्ड इन्सेंटिव्ह (PLI) योजनेची नवीन आवृत्ती अर्थात PLI २.० आणण्याची तयारी करत आहे.




या नव्या योजनेचा मुख्य उद्देश मोबाइल फोन उत्पादनासाठी आवश्यक असलेल्या घटकांचे देशांतर्गत उत्पादन वाढवणे आणि आयातीवरील अवलंबित्व कमी करणे हा आहे. सरकारचे लक्ष्य आहे की भविष्यात मोबाइल फोनमध्ये वापरले जाणारे किमान ५५ टक्के कॉम्पोनंट्स भारतातच तयार व्हावेत. सध्या हे प्रमाण केवळ १८ ते २० टक्के इतके आहे.

मिळालेल्या माहितीनुसार सरकार ही नवी योजना ₹४०,००० कोटींच्या इलेक्ट्रॉनिक्स कॉम्पोनंट मॅन्युफॅक्चरिंग स्कीम (ECMS) सोबत जोडून राबवण्याचा विचार करत आहे. यामुळे खालील महत्त्वाच्या घटकांच्या स्थानिक उत्पादनाला चालना मिळणार आहे. या घटकांचे उत्पादन भारतात वाढल्यास स्मार्टफोन उद्योगाची आयातीवरील अवलंबित्व मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते.


कंपन्यांना अतिरिक्त प्रोत्साहन मिळणार

वित्त मंत्रालयाने याबाबत चिंता व्यक्त केली आहे की, भारत आज जगातील प्रमुख स्मार्टफोन उत्पादन आणि निर्यात केंद्रांपैकी एक बनत असला तरी अनेक महागडे इलेक्ट्रॉनिक घटक अद्याप परदेशातून आयात करावे लागतात. यामुळे नव्या PLI २.० योजनेत केवळ विक्री आणि उत्पादन वाढवण्यावर भर न देता स्थानिक पुरवठा साखळी आणि भारतातच घटक निर्मिती करण्यावर अधिक लक्ष केंद्रित केले जाणार आहे. सरकार अशा कंपन्यांना अतिरिक्त प्रोत्साहन देऊ शकते ज्या भारतातच आवश्यक मोबाइल कॉम्पोनंट्सचे उत्पादन करतील किंवा देशांतर्गत पुरवठादारांकडून खरेदी करतील.

PLI योजनेचा आतापर्यंतचा प्रभाव

२०२०मध्ये सुरू करण्यात आलेल्या PLI योजनेमुळे भारतातील मोबाइल उत्पादन क्षेत्राला मोठी चालना मिळाली आहे. सरकारी आकडेवारीनुसार या योजनेंतर्गत आतापर्यंत ३२ कंपन्यांनी गुंतवणूक, उत्पादन आणि निर्यातीची उद्दिष्टे ओलांडली आहेत.

# साहित्यिक गोविंदराव टेंबे



## निमित्त

प्रख्यात महाराष्ट्रीय हार्मोनियमवादक, संगीतरचनाकार, गायकनट व साहित्यिक गोविंदराव सदाशिव टेंबे यांचा जन्म ५ जून १८८१ रोजी सांगवडे (जि. कोल्हापूर) येथे झाला. त्यांच्या आईचे नाव अंबा. गोविंदरावांनी कोल्हापूर येथेच शालेय व महाविद्यालयीन शिक्षण घेतले व काही वर्षे सनदी वकिली केली.

गायनाच्या कार्यक्रमात जाऊन त्यांना संवादिनी (हार्मोनियम) या वाद्याची आवड निर्माण झाली. प्रत्यक्ष या वाद्यवादनाचे रीतसर शिक्षण त्यांनी घेतले नव्हते, मात्र स्वप्रयत्नाने त्यांनी या वादनात प्रावीण्य मिळवले. गोविंदराव भास्करबुवा बखले यांच्या साथीला असायचे आणि बहुतेक वेळा संवादिनीचा एकपात्री प्रयोगही करायचे. ते बर्कतुल्ला सितारिये यांचे गंडाबंद शागीर्द होते.


अयोध्येचा राजा या पहिल्या मराठी बोलपटात ते नायकाच्या प्रमुख भूमिकेत होते. या चित्रपटाचे संगीतदिग्दर्शनही त्यांनी केले होते. यांखेरीज त्यांनी पट-वर्धन (१९२४), तुलसीदास (१९२८), वत्सलाहरण (१९२९), वरवंचना (शेरिडनच्या ड्यूएन्नाचे रूपांतर, १९२५), गंभीर घटना (ऑस्कर वाईल्डच्या इंपॉर्टन्स ऑफ बीइंग अर्नेस्टचे रूपांतर, १९३२), तारकाराणी, देवी कामाक्षी, मत्स्यभेद इ. नाटके लिहिली तसेच महाश्वेता, जयदेव, प्रतिमा इ. संगीतिका (ऑपेरा) लिहून त्या सादरही केल्या. १९३९मध्ये त्यांनी म्हैसूर संस्थानच्या युवराजांबरोबर यूरोपचा दौरा केला. तेथे त्यांना पोपच्या समोर कार्यक्रम करण्याची संधी मिळाली.

संवादिनी या साथीच्या वाद्याला टेंबे यांनी स्वतंत्र वाद्याची प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. पेटीवर बोटे टाकण्याची त्यांची पद्धत अंतःकरणाचा ठाव घेणारी होती. जयपूर घराण्याची तेढी, बिकट गायकी व अभिजात नाट्यसंगीत या दोहोंचे वादन ते सारख्याच कुशलतेने पेटीवर करीत. संगीतातील काही बाळबोध प्रकारांवर आधारलेल्या किर्लोस्करी नाट्यसंगीताला अभिजात हिंदुस्थानी संगीताचा तसेच वेधक कर्नाटकी चालींचा नवीन साज चढविण्यात व संगीताला नाटकात अग्रेसर स्थान प्राप्त करून देण्यात टेंबे यांचा वाटा फार मोठा आहे. या दृष्टीने मानापमान व विद्याहरण या नाटकांतील चाली उल्लेखनीय आहेत. त्यांनी मराठी संगीताचा मानबिंदू अशा लक्षणगीतांची रचना केली.

माझा संगीत-व्यासंग (१९३९), माझा जीवन विहार (आत्मचरित्र, १९४८), खाँसाहेब अल्लादियाखाँ यांचे चरित्र (१९५४), जीवनव्यासंग (१९५६) ही त्यांची महत्त्वाची ग्रंथनिर्मिती. टेंबे यांच्या ग्रंथांतून नाट्य व संगीताची दुनिया अतिशय हृद्यतेने रूपास आली आहे. नाट्यसंगीताचे पहिले शिल्पकार, संगीतक्षेत्रातील पहिले सौंदर्यमीमांसक, संगीतिकांचे पहिले प्रवर्तक वगैरे अनेक क्षेत्रांत ते पहिले म्हणून गाजले. भारत नाट्य संमेलन (१९३३), मराठी रंगभूमी शतसांवत्सरिक उत्सव, नागपूर (१९४३), मराठी साहित्य परिषद, बडोदे आदींची अध्यक्षपदेही त्यांनी भूषविली. कोल्हापूरातील गायन समाज देवल क्लब या संस्थेशी त्यांचा निकटचा संबंध होता. ते या संस्थेचे काही काळ संचालकही होते. या संस्थेमध्ये त्यांच्या स्मरणार्थ' गोविंदराव टेंबे रंगमंदिर' उभारण्यात आलेले आहे.

गोविंदरावांचा विवाह लक्ष्मी यांच्याशी झाला. त्यांना रघुनाथ, गणेश व माधव हे तीन पुत्र. गोविंदरावांचे दिल्ली येथे ९ ऑक्टोबर १९५५ रोजी निधन झाले. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# रोज सकाळी कोमट पाणी पिण्याचे फायदे

सकाळच्या वेळी रिकाम्या पोटी गरम पाणी पिणं तब्येतीसाठी बरंच फायदेशीर ठरतं. सकाळी कोमट पाणी प्यायल्यानं तब्येतीला बरेच फायदे मिळतात. एक्सपर्ट्र्ससुद्धा सकाळच्यावेळी कोमट पाणी पिण्याचा सल्ला देतात. काही लोक सकाळी पाणी पिण्याशिवाय रात्रीसुद्धा कोमट पाणी पितात. वजन कमी करण्यापासून ते पचनाच्या समस्या टाळण्यापर्यंत बऱ्याच गोष्टींसाठी गरम पाणी फायदेशीर ठरते.



गरम पाणी प्यायल्यानं शरीराला काय फायदे मिळतात?

पचनक्रिया चांगली राहते : गरम पाणी प्यायल्यानं पचनक्रिया चांगली राहते. कोमट पाणी प्यायल्यानं गॅस, एसिडीटी यांसारख्या समस्या उद्भवत नाही. पचनक्रिया चांगली राहते.

ब्लड सर्क्युलेशन व्यवस्थित राहते : गरम पाणी प्यायल्यानं शरीरात ब्लड सर्क्युलेशनही चांगले राहते. जे रक्त वाहिन्यांमध्ये पसरते. ज्यामुळ टिश्यू आणि शरीराच्या विविध भागांपर्यंत ब्लड फ्लो आणि ऑक्सिजनचा पुरवठा वाढतो.

ताण कमी होतो : गरम पाणी नर्व्हस सिस्टिम एक्टिव्हेट करते ज्यामुळे आराम मिळतो आणि ताण कमी होतो. कोमट पाण्यामुळे डायजेस्टिव्ह सिस्टिमला आराम मिळतो. ज्यामुळे तब्येत चांगली राहण्यास आणि झोपेची गुणवत्ता सुधारण्यास मदत होते.

शरीर डिटॉक्स होते : गरम पाण्यामुळे शरीर डिटॉक्स होते. गरम पाणी प्यायल्यानं घाम खूप येतो. ज्यामुळे शरीरातील टॉक्सिन्स कमी होण्यास मदत होते आणि त्वचेवर ग्लो येतो.

वजन कमी होण्यास मदत : सकाळी उठल्यानंतर सगळ्यात आधी जर तुम्ही कोमट पाणी प्यायलात तर शरीराचं तापमान नियंत्रणात राहील आणि वजन कमी होण्यास मदत होईल. गरम पाणी प्यायल्यामुळे मेटाबॉलिझ्म फास्ट होतो. गरम पाणी प्यायल्यानं महिला आणि पुरूषांमध्ये मेटाबॉलिझ्म जवळपास ३० टक्के वाढतो.

पाणी पिण्याची योग्य पद्धत

नेहमी जमिनीवर किंवा खुर्चीवर बसून शांतपणे पाणी प्या. उभं राहून प्यायल्यानं सांधेदुखीचा त्रास उद्भवू शकतो. पाणी एकदम गटागटा न पितात चहा प्यायल्यासारखे हळूहळू घोट-घोट करून प्या. यामुळे तोंडातील लाळ मिसळून पोटात जाते. पाणी जास्त गरम असू नये. ते फक्त कोमट किंवा कोमटपेक्षा थोडं कमी गरम असावं. जे सहज पिता येईल.

# रायगड जिल्ह्यात शेतीच्या कामांना झाली सुरुवात





**अलिबाग : प्रतिनिधी**

यंदा पावसाळा उशिरा सुरु होणार आहे तरी देखील रायगड जिल्ह्यात शेतकरी कामाला लागला आहे. पावसाळ्यापूर्वीची मशागतीची कामे शेतकऱ्यांनी सुरु केली आहेत. रायगडात धूळपेरणीची कामे सुरु झाली आहेत. बांधबंदिस्ती , चार मारणे, ढेकालांची उलकटनी ही कामे देखील सुरु झाली आहेत. यंदाच्या खरीप हंगामात रायगड जिल्ह्यात ७३ हजार २६५ हेक्टर क्षेत्रावर भात लागवड करण्याचे तसेच उत्पादकता हेक्टरी २१३३ किलो ग्राम करण्याचे नियोजन कृषि विभागाने केले आहे. २५७३ हेक्टर क्षेत्रावर नाचणी लागवडीचे तर २९ हेक्टर क्षेत्रावर तृणधान्य लागवडीचे नियोजन करण्यात आले आहे.

दरम्यान, बोगस बियाणे विकणारे एजंट, बनावट कंपन्या आणि अप्रमाणित व्यापारी सक्रिय झाल्याने शेतकऱ्यांसमोर फसवणुकीचा मोठा धोका आता निर्माण होताना दिसत आहे. त्यामुळे बियाणे खरेदी करताना शेतकऱ्यांनी अधिक सतर्क राहण्याचे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.

## उच्चशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरू

**रायगड : अलिबाग**

राज्यातील इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील व्यावसायिक व बिगर व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी जिल्हानिहाय वसतीगृहे सुरु करणे या योजनेंतर्गत रायगड जिल्ह्यात इतर मागास बहुजन कल्याण मुलांचे शासकीय वसतीगृह, वाशी नवी मुंबई (व्ही. बिल्डिंग पहिला मजला, प्लॉट नंबर ७, सेक्टर १९ वी, वाशी नवी मुंबई) येथे सुरु झाले आहे.

सन २०२६–२७ पासून पुढे वसतिगृहासाठी विहित मुदतीत अर्ज करणाऱ्या व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश देय राहील. तसेच, ज्या पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण विद्यार्थ्यास पदवी अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षास प्रवेश देय आहे त्याच पदवी अभ्यासक्रमास द्वितीय वर्षाकरिता प्रवेश देय राहील. तद्नंतर या योजनेंतर्गत जागा रिक्त राहिल्यास पात्र विद्यार्थ्यांना अनुक्रमे तृतीय व चतुर्थ वर्षात प्रवेश देय राहील. तथापि, द्वितीय, तृतीय व चतुर्थ वर्षात प्रवेश घेताना १२ वी परीक्षेच्या अंतिम निकालाचे गुण विचारात घेण्यात येतील.

२०२६–२७ साठी अभ्यासक्रमनिहाय, जात प्रवर्गनिहाय रिक्त जागा दर्शविणारे विवरणपत्र :–प्रवर्ग–इतर मागास वर्ग, एकूण आरक्षण ५१ टक्के, प्रवर्ग–विमुक्त जाती व भटक्या जमाती, आरक्षण ३३ टक्के, प्रवर्ग–विशेष मागास प्रवर्ग, आरक्षण ६ टक्के, प्रवर्ग–दिव्यांग, आरक्षण ४ टक्के, प्रवर्ग– अनाथ, आरक्षण २ टक्के, प्रवर्ग–आर्थिक मागास प्रवर्ग (EWS), आरक्षण ४ टक्के.

## कोळीवलीत सोनसाखळी चोरट्याला नागरिकांनी रंगेहाथ पकडले

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील नेरळ पोलिस ठाणे हद्दीतील कोळीवली गावात गुरुवारी (दि. ४) सकाळी साडेअकराच्या सुमारास सोनसाखळी चोरी करण्यासाठी आलेल्या एका चोरट्याला जागरूक नागरिकांनी रंगेहाथ पकडून चांगलाच धडा शिकवला. महिलेच्या गळ्यातील सोनसाखळी हिसकावण्याचा प्रयत्न करत असतानाच महिलेने आरडाओरडा केल्याने ग्रामस्थांनी धाव घेत चोरट्याला पकडले आणि नंतर नेरळ पोलिसांच्या ताब्यात दिले.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, धनाजी अनंता घरत असे पकडण्यात आलेल्या संशयिताचे नाव असून तो सध्या बदलापूर येथील मांजर्ली परिसरात राहत आहे. तर त्याचे मूळ गाव मुरबाड तालुक्यात असल्याची माहिती समोर आली आहे. गुरुवारी सकाळी सुमारे ११.३० वाजण्याच्या सुमारास कोळीवली गावातील एका महिलेच्या गळ्यातील सोनसाखळी हिसकावण्याचा प्रयत्न संशयिताने केला. मात्र संबंधित महिलेने प्रसंगावधान राखत मोठ्याने आरडाओरडा सुरू केला. त्यामुळे परिसरातील नागरिक सतर्क झाले. चोरीचा प्रयत्न फसल्याचे लक्षात येताच संशयिताने मोटारसायकलवरून पळ काढण्याचा प्रयत्न केला.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :–

**मौजे– शिवकर, तालुका–पनवेल, जिल्हा–रायगड.**

| भूमापन नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| ३७/१ | ०–७५–००<br>पो.ख. ०–०३–३०<br>एकूण ०–७८–३० | १२.५४ | श्री. नारायण नामा ढवळे<br>श्री. वसंत नामा ढवळे |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. ०४/०६/२०२६.** **सही/–**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल. मो.क्र. : ९९३०३६९८६१


## एसटी बस लालपरीचा ७८वा वर्धापन दिन रोहा स्थानकात साजरा

**धाटाव : प्रतिनिधी**

राज्य परिवहन महामंडळाच्या लालपरीचा ७८ वा वर्धापन दिन सोहळा रोहा एस.टी.बस स्थानकात मोठ्या उत्साही वातावरणामध्ये साजरा करण्यात आला.

१ जून १९४८ रोजी नगर–पुणे–नगर या मार्गावर पहिली बस धावली. लाडक्या लालपरीचा ७८वा वाढदिवस साजरा करताना वर्धापन दिनाचे औचित्य साधत रोहा स्थानकावर प्रवाशांसाठी



मोफत वाचनालयही सुरू करण्यात आले. यावेळी आगारातील एसटी कर्मचारी हेमंत कदम, नेथू गावित, संदीप गायकवाड, प्रवीण कोटकर, अमोल अंभोरे, अरुण केंद्रे, रणजीत जांभेकर, राजेश सोलंकी, प्रियंका चव्हाण, छाया घोरपडे, अनिता शिद तसेच चालक, वाहक सूर्यकांत कळवले, गणेश लगड, नितीन पालवे तसेच एसटीप्रेमी प्रवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तीर्थक्षेत्र पालीत संकष्टी चतुर्थीला फुलला भक्तिमळा

**पाली : प्रतिनिधी**

संकष्टी चतुर्थीला बुधवारी (दि.३) अष्टविनायक तीर्थक्षेत्र पालीत भाविकांनी गर्दी केली होती. श्री. बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी पहाटे पासूनच लांब रांगा लागल्या होत्या. उन्हाळी सुट्ट्या असल्याने पालीत हजारो भाविक दाखल झाले होते.



श्री. बल्लाळेश्वर मंदिर व गाभाऱ्यात फुलांची सजावट करण्यात आली होती. श्री. बल्लाळेश्वरला देखील आभूषण व वस्त्र परिधान करण्यात आले होते. तसेच मंदिरा बाहेर रांगोळी देखील काढण्यात आली होती. श्री. बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रभरातून व भारतातून भाविक दाखल झाले होते. यामुळे येथे चांगली आर्थिक उलाढाल झाली असून येथील स्थानिक व्यावसायिक सुखावले आहेत.

यावेळी वाहतुकीची व्यवस्था बदलन्यात आली होती. ग्रामीण रुग्णालयाच्या समोरून भक्तनिवास क्रमांक एक च्या पाठीमागून भक्तनिवास क्रमांक दोन जवळ वाहतुक वळविण्यात आली होती. भाविकांमुळे येथील हॉटेल व्यावसायिक, लॉजिंग बोर्डिंग वाले, पापड, लोणचे मिरगुंड विक्रेते, पेढेवाले, छोटे मोठे दुकानदार व इतर व्यावसायिकांचा धंदा तेजीत होता. मंदिर परिसरातील दुकाने व हॉटेल ग्राहकांनी गजबजले होते. आदिवासी महिला रानमेवा घेऊन विक्रीसाठी आल्या होत्या. भाविकांच्या सोयीसाठी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने चोख व्यवस्था करण्यात आली होती. विविध वस्तूंनी भरलेली दुकाने व गर्दी यामुळे मंदिर परिसर गजबजलेला दिसत होता.


**परिशिष्ट क्र. १६**
(उपविधी क्र. ३५ अन्वये)
**मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलात / मालमत्तेत असलेले हितसंबंध व भाग हस्तांतरित करण्याबाबत हक्क मागण्या किंवा हरकती मागविण्यासाठी द्यावयाच्या नोटिशीचा नमुना**

### नोटीस

**सरकारी नोकर** सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, पत्ता नवीन पनवेल या संस्थेचे सदस्य असलेल्या वा संस्थेच्या इमारतीत/भूखंडावर/ गाळा/ बंगला क्र................. ....धारण करणाऱ्या **श्री. हरिश्चंद्र शिवराम पवार** यांचे तारीख १४/०३/२०२६ रोजी निधन झाले. त्यांनी नामनिर्देशन केलेले नाही. संस्था, या नोटिशीद्वारे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले मयत सदस्याचे भाग व हितसंबंध हस्तांतरित करण्यासंबंधी मयत सदस्याचे वारसदार किंवा अन्य मागणीदार / हरकतदार यांच्याकडून हक्क मागण्या / हरकती मागवण्यात येत आहेत. ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून **१५** दिवसात त्यांनी आपल्या मागण्यांच्या वा हरकतींच्या पुष्टयर्थ आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती व अन्य पुरावे सादर करावेत. जर वर नमूद केलेल्या मुदतीत कोणाही व्यक्तीकडून हक्क मागण्या किंवा हरकती सादर झाल्या नाहीत तर, मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलातील/मालमत्तेतील भाग व हितसंबंध यांच्या हस्तांतरणाबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहील. जर अशा कोणत्याही हक्कमागण्या/ हरकती आल्या तर, त्याबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्यात येईल. नोंदी व उपविधींची एक प्रत मागणीदारांस / हरकतदारांस पहाण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात सचिव यांचेकडे दुपारी १२.०० वा. ते दुपारी ४.०० वा. पर्यंत, नोटिस दिल्याच्या तारखेपासून नोटिशीची मुदत संपण्याच्या तारखेपर्यंत उपलब्ध राहील.

ठिकाण : नवीन पनवेल.
दिनांक : ०५/०६/२०२६

**सही/–**
**सचिव**
सरकारी नोकर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, नवीन पनवेल


# रोहा तालुक्यात भातशेती क्षेत्र घटतेय; वाढते शहरीकरण आणि तरुणांची उदासीनता ठरतेय मारक

**रोहा : प्रतिनिधी**



जिल्ह्यात भातशेतीसाठी प्रसिद्ध असलेल्या रोहा तालुक्यात शेती ओसाड पडत असून तालुक्यातील भात शेती क्षेत्र घटत असल्याचे दिवसेंदिवस दिसून येत आहे. एकेकाळी रायगड जिल्हा भाताचे कोठार म्हणून ओळखले जायचे. जिल्ह्यातील भातशेतीसाठी रोहा तालुका हा प्रसिद्ध होता त्यामुळे मोठ्या प्रमाणात रोहा तालुक्यात भातावर आधारित पोह्याचे कारखाने होते. रोहाचे पोहे संपूर्ण महाराष्ट्रभर प्रसिद्ध होते.

आज हे कारखाने नाजूक स्थितीत आहेत. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे रोहा तालुक्यातील भात शेती घटत असल्याचे चित्र दिसत आहेत. या पोहा कारखानांना आता भात बाहेरून आणला जातो. रोहा तालुक्यात पावसाळी व उन्हाळी भात शेती लावली जात असत. पारंपारिक सोना, जया, रत्ना यासह अन्य जातीचे बियाणे लावली जात असत. पावसावर अवलंबून असलेली पावसाळी भात शेतीचे पूर्वी २०१७ च्या आधी क्षेत्र ९८०० हेक्टर होते ते हळूहळू कमी होत आज ७१०० हेक्टर एवढे झाले आहे. तर उन्हाळी म्हणजे कालव्याच्या व कुंडलिका नदीच्या पाण्यावर अवलंबून असलेले भात शेतीचे क्षेत्र २००० हेक्टर पेक्षा जास्त होते. अता २०० ते ३०० हेक्टर वर भात शेती लावली जाते. पूर्वी भातशेतीची उत्पादन क्षमता हेक्टरी कमी असले तरी लागवडीचे क्षेत्र मात्र जास्त होते आता लागवडीचे क्षेत्र कमी असले तरी उत्पादन हेक्टरी वाढले आहे. पूर्वी हेक्टरी हेक्टरी भाताचे २६ ते २७ टन उत्पादन काढले जात होते आता तेच हेक्टरी भाताचे ३२ टन उत्पादन काढले जाते. परंतु आता भात लागवडीचे क्षेत्र घटले आहे.

भात शेती लागवडीचे क्षेत्रघटनाच्या अनेक कारणे पुढे येत आहेत. यामध्ये प्रामुख्याने शेतीकडे तरुणांची उदासीनता दिसून येते. औद्योगिक क्षेत्रात नोकरी करणे शेतीपेक्षा तरुणांना योग्य वाटत आहे. शेतात राबण्याची मेहनत कमी होत आहे. वाढते शहरीकरण ही भात लागवड क्षेत्र कमी होण्याचे कारण ओळखले जाते. मजुराची टंचाई भासत असल्याने अनेकांनी भातशेती करणे सोडले आहे. काही प्रयोग शेतकऱ्यांनी मात्र यांत्रिकीकरणाचा वापर करत आज भातशेती करताना दिसत आहेत. उत्पादनासाठी लागणारा खर्च जास्त असून उत्पादनातून उत्पन्न कमी येत असल्याने भातशेती करणे खर्चिक आहे.

# चविष्ट गोड्या पाण्यातील माशांसाठी बाजारात खवय्यांची गर्दी

## आटलेल्या पाण्यात आता गोड्या पाण्यातील मासेमारी जोरात सुरू

**पाली :** सध्या उन्हाळ्याची तीव्रता वाढली आहे. तीव्र उन्हामुळे नदी, तलाव, धरणे आणि पाणवठे यांचे पाणी मोठ्या प्रमाणावर आटले आहे. या आटलेल्या पाण्यात आता गोड्या पाण्यातील मासेमारी जोरात सुरू झाली आहे. पाणी कमी झाल्यामुळे विविध प्रकारचे चविष्ट गोडे मासे मोठ्या प्रमाणात हाती लागत असून, ते बाजारात विक्रीसाठी येत आहेत. यामुळे उन्हाळ्याच्या या दिवसांत खवय्यांच्या उड्या आता चविष्ट गोड्या पाण्यातील माशांवर पडत असून बाजारात खरेदीसाठी मोठी गर्दी होत आहे.

नद्या, तलाव, धरण, पाणवठे, ओढे आणि ओहळ येथील पाणी आटत आल्यामुळे तिथे सापडणाऱ्या माशांची आवक बाजारपेठेत कमालीची वाढली आहे. यामध्ये मळे, कोलीम, म्हूऱ्या, शिवडा, अरलय, वाम, कोलंबी, मोठी शेवंड, कटला, फंटूस व खवल आदी माशांचा समावेश आहे. मळे आणि म्हूऱ्या हा प्रकार या दिवसांत अधिक प्रमाणात मिळतो. त्यामुळे खवय्ये हे मासे आवर्जून खरेदी करत आहेत. स्थानिक नागरिकांसह काही जण मुंबई, ठाणे आदी शहरांत राहणाऱ्या आपल्या नातेवाईकांना देखील उन्हाळ्याची ही खास भेट म्हणून गोडे मासे पाठवत आहेत.

पारंपरिक कोळी बांधवांबरोबरच प्रामुख्याने आदिवासी आणि गळभोई समाजातील लोक सध्याच्या कडक उन्हात खूप मेहनतीने हे मासे पकडत आहेत. नदी, तलाव, धरण येथे टायर ट्यूबवर बसून गाळाने व जाळी टाकून ही मासेमारी केली जात आहे. पाणी आटल्यामुळे मासे पकडणे सोपे झाले असून सध्या मासे खूप मिळत आहेत. हे मासे विकून या कष्टकरी बांधवांच्या हाती चार पैसे मिळत असल्याने त्यांचा उदरनिर्वाह चांगला सुरू आहे.

**नातेवाइकांना गोड्या माशांची भेट**

सध्या उन्हाळ्यामुळे गोड्या पाण्यातील मासे बाजारात विक्रीसाठी मोठ्या प्रमाणात येत आहेत. शहरात असणाऱ्या नातेवाईकांना आवर्जून भेट म्हणून आम्ही हे गोडे मासे पाठवले आहेत. मळे, शिवडा, कटला व



म्हूऱ्या हे मासे अनेकांना खूप आवडतात असे माणगाव येथील गृहिणी प्रियांका हेमंत गोसावी यांनी सांगितले.

**माशांचे दर (रुपयांमध्ये) :–** जिल्ह्यात विविध ठिकाणी बाजारपेठेनुरूप याचे वेगवेगळे किमती दर आहेत. एका पानावर वाटा करून देखील माशांची विक्री होत आहे. १) मळे: २०० ते २५० रुपये किलो.,२) कोलीम (बारीक कोळंबी): ५० ते ६० रुपये वाटा, ३) म्हूऱ्या: ४० रुपये वाटा , ४) शिवडा, कटला व वाम: ५०० ते ६०० रुपये किलो., ५) मोठी गोडी कोलंबी (शेवंड): १००० ते १२०० रुपये किलो., ६) फंटूस: ३०० ते ४०० रुपये किलो.

## एमबीए सीईटीत ९०.०४ टक्के गुण; वांगणीच्या मंथन ठाकूरची दमदार कामगिरी

**नागोठणे** : महाराष्ट्र राज्य सामायिक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्षामार्फत एप्रिल २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या एमबीए/एमएमएस सीईटी परीक्षेत नागोठण्याजवळील वांगणी–आमडोशी येथील कु. मंथन कांचन ठाकूर याने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. पहिल्याच प्रयत्नात ९०.०४ टक्के गुण मिळवत त्याने आपल्या गुणवत्तेची छाप पाडली आहे.

मंथन हा सुप्रिम पेट्रोकेम लिमिटेड कंपनीचे कामगार नेते कांचन ठाकूर यांचा सुपुत्र आहे. त्याने लोणेरे–माणगाव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठातून (बाटू) इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन शाखेची अभियांत्रिकी पदवी प्राप्त केली आहे. काही काळ नोकरी केल्यानंतर व्यवस्थापन क्षेत्रातील आवडीमुळे त्याने एमबीए सीईटी परीक्षेची तयारी केली आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर हे यश मिळविले.या यशाच्या बळावर मंथन याला मुंबईतील बांद्रा येथील भुजबळ नॉलेज सिटीमधील मुंबई एज्युकेशन ट्रस्टच्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट या नामांकित संस्थेत दोन वर्षांच्या पूर्णवेळ बिझनेस एनालिटिक्स अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळाला आहे. व्यवसायातील माहिती व सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे निर्णय घेण्याच्या या आधुनिक आणि महत्त्वपूर्ण क्षेत्रात तो पदव्युत्तर शिक्षण घेणार आहे.


महावितरण

### निविदा सूचना

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या संचालन व सुव्यवस्था विभाग रोहा कार्यालया अंतर्गत मटेरियल ट्रान्सपोर्ट च्या कामासाठी वर्ष २०२६–२७ करीता परवानाधारक ठेकेदाराची नियुक्ती करणेसाठी ई–निविदा क्रमांक टी – ०५ निविदा महावितरण कंपनीच्या https://etender.mahadiscom.in/eatApp/ संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली आहे. सदर निविदा विक्रीसाठी दि. ०४.०६.२०२६ ते १२.०६.२०२६ पर्यंत उपलब्ध राहील. निविदा भरण्याची अंतिम तारिख दि. १२.०६.२०२६ ला रात्रौ ११.०० वाजेपर्यंत आहे. निविदेच्या आवृत्तीत / शुद्धी पत्रातील कोणताही बदल यापुढे आमच्या संकेत स्थळावर प्रकाशित केला जाईल.

**PRO NO - 061** **कार्यकारी अभियंता, रोहा विभाग**



### जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येत आहे की खालील परिशिष्टात नमूद केलेली शेतजमिन मिळकत ही मालक **श्री. तेजस तुकाराम पाटील** यांच्याकडून कायमस्वरूपी विकत घेण्याबाबतचा व्यवहार आमचे अशील यांनी ठरवलेला आहे व या व्यवहारा संदर्भात जाहीर नोटीस वर्तमानपत्रात देण्याबाबत विद्यमान मालक **श्री. तेजस तुकाराम पाटील** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या आशिलांच्या सांगण्यावरून ही वर्तमानपत्रात जाहीर नोटीस देत आहेत.

**मिळकतीचे वर्णन :** मौजे – खार दुतर्फा बोर्ली (५५३८७८ ),
ULPIN : १४६७३१७८३८०, ता. पेण, जि. रायगड

| गट क्रमांक | भुधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ७४/४<br>खाते क्रमांक १२३६ | २ | ०.१५.००<br>पो.ख ०.००.५० | २.०३ |
| | | एकूण क्षेत्र ०.१५.५० | |
| **या एकूण विक्री क्षेत्राचे** | | **०.१५.५०** | |

वर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तीच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षीस, खरेदीखत, साठे करार, मिळकत विकसित करणे बाबतचा करार, कुळ हक्क, वारसाहक्क वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा पोटगी, मृत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क इ. संबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्का बाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपतत्री पुराव्या सह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **७ दिवसांच्या आत** खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदपत्री पुरावास आपली लेखी हरकत व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क व हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत व सदर मिळकत निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतिनंतर उपस्थित करण्यात आलेला कोणत्या हरकती व आक्षेप आमच्या आशीलांवर बंधनकारक असणार नाही त्याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०५ जून २०२६

**सही/–**
**ॲड. निलेश झंजाड**
बी १०४ सफायर, सी. एच. एस. लि., सेक्टर २२ भूखंड क्रमांक ३३/३४ कामोठे – ता.पनवेल, जि. रायगड
बि. सं. क्र. ९९२०४७५८०१

# मागेल त्याला झाड अभियानाचा शुभारंभ

## नवी मुंबई हरित करण्यासाठी नाईक प्रतिष्ठान सरसावले

**नवी मुंबई : बातमीदार**

जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने नवी मुंबईतील संदीप नाईक प्रतिष्ठानच्या वतीने 'मागेल त्याला झाड' अभियानाचा पर्यावरण दिनाच्या पूर्वसंध्येला शुभारंभ करण्यात आला. संदीप नाईक प्रतिष्ठानच्या वतीने गेली २५ वर्षाहून अधिक काळ व्यापक प्रमाणात पर्यावरण संवर्धन मोहीम राबवली जाते आहे. माजी आमदार संदीप नाईक यांच्याहस्ते शालेय विद्यार्थी, पर्यावरण प्रेमी संस्थांचे प्रतिनिधी आणि लोकप्रतिनिधी यांना प्रातिनिधिक स्वरूपात वृक्ष रोपांचे वाटप करण्यात आले. पृथ्वीवरील निसर्गाचा ठेवा आपल्याला पुढच्या पिढीपर्यंत सुपूर्द करायचा आहे त्यामुळे प्रत्येकाने पर्यावरण संवर्धन आणि पर्यावरण रक्षणासाठी योगदान देण्याचे आवाहन संदीप नाईक यांनी यावेळी केले.



मानव निसर्गाचा वापर आपल्या गरजांसाठी करतो मात्र अजाणतेपणी निसर्गाला हानी पोहोचते. पर्यावरणीय बदलांमुळे अवकाळी पाऊस, गारपीट, दुष्काळ, पूर अशी संकटे येऊन मानव आणि पर्यावरणाची हानी होत असते. हे टाळण्यासाठी पर्यावरण संतुलन राखणे गरजेचे आहे, असे मत संदीप नाईक यांनी व्यक्त केले. पर्यावरण संवर्धन केवळ जागतिक पर्यावरण दिनापुरता मर्यादित न ठेवता वर्षातील ३६५ दिवस पर्यावरण पूरक कृती आपण करायला हवी. आपल्या दैनंदिन जीवनामध्ये अशा गोष्टी टाळायला हव्यात जेणेकरून पर्यावरणाची हानी होईल.

पर्यावरण संवर्धनामध्ये विद्यार्थी आणि युवा वर्गाला सहभागी करून पर्यावरण चळवळीची व्याप्ती वाढविण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. शाळा, महाविद्यालये, गृह संकुले, सार्वजनिक जागा, औद्योगिक परिसर, डोंगर अशा विविध ठिकाणी त्या-त्या भागामध्ये जगतील आणि उपयोगी पडतील अशा वृक्षारोपांची लागवड करण्याची सूचना केली. वृक्षारोपे लावली म्हणजे निसर्गाप्रती आपले कर्तव्य पार पाडले, असे नाही तर लावलेली झाडे जगली पाहिजेत यासाठी जाणीवपूर्वक काळजी घेण्याचे आवाहन देखील संदीप नाईक यांनी केले.

पर्यावरण चळवळ ही जन चळवळ व्हाव. आपण सर्व मिळून पर्यावरण रक्षणाची ही लढाई जिंकू, असा विश्वास देखील त्यांनी व्यक्त केला. या कार्यक्रमास शालेय विद्यार्थी, पर्यावरण प्रेमी संस्थांचे सदस्य, नगरसेवक गिरीश म्हात्रे, नगरसेवक सचिन लवटे, नगरसेवक संदीप म्हात्रे, माजी नगरसेवक रमेश डोळे, नगरसेवक रॉबिन मढवी, प्राचार्य प्रताप महाडिक यांच्यासह निसर्गप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**'मागेल त्याला झाड' उपक्रम...**

संदीप नाईक प्रतिष्ठानच्या वतीने मागील तीन वर्षे नवी मुंबईमध्ये 'मागेल त्याला झाड' उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात येतो आहे. यावर्षी देखील हा उपक्रम राबविण्यात येणार असून ज्या संस्था आणि व्यक्ती ज्यांना वृक्षारोपणासाठी वृक्षरोपे हवी आहेत त्यांनी सकाळी ९.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत ९३२६१८३५२५ या मोबाईल क्रमांकावर आपली मागणी नोंदवावी.

# खोपटे-कोप्रोली महामार्गावर गतिरोधक बसविण्याची ग्रामस्थांची मागणी

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील खोपटे-कोप्रोली या नव्याने काँक्रेटीकरण करण्यात आलेल्या मुख्य महामार्गावर वाहनांचा वाढता वेग नागरिकांच्या जीवावर बेतण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

अपघातांचे प्रमाण रोखण्यासाठी या मार्गावर तातडीने गतिरोधक (स्पीड ब्रेकर) उभारावेत, अशी मागणी ग्रामस्थ मंडळ खोपटे यांच्या वतीने सार्वजनिक बांधकाम विभाग व तहसील प्रशासनाकडे ३ जून रोजी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.




उरण-खोपटा हा परिसरातील अत्यंत महत्वपूर्ण व वर्दळीचा मार्ग मानला जातो. रस्त्यालगत अनेक औद्योगिक कंपन्या असल्याने अवजड वाहनांची सतत ये-जा सुरू असते. नुकतेच या रस्त्याचे काँक्रिटीकरणाचे काम पूर्ण झाल्यापासून वाहनचालकांचा वेग मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

विशेष म्हणजे याच मार्गावरून दररोज शेकडो शाळकरी विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच रुग्ण प्रवास करत असतात. रस्त्यावर गतिरोधक नसल्याने यापूर्वी अपघात घडले असून, भविष्यात एखादी गंभीर दुर्घटना घडण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे.

खोपटे ग्रामस्थ मंडळाने प्रशासनाला सादर केलेल्या निवेदनात कारवान गोडाऊन जवळ,धसाखोशी,द.पी.पाडा बस स्टॅन्ड, म्हात्रेपाडा बस स्टॅन्ड,आणि विरगो बस स्टॅन्ड या ठिकाणी तातडीने गतिरोधक व वाहतूक सूचना फलक उभारण्याची मागणी केली आहे.

यावेळी ग्रामस्थ मंडळ खोपटा गावचे अध्यक्ष संतोष पाटील, सचिव कुमार ठाकूर, धसाखोशी अध्यक्ष कमलाकर म्हात्रे तसेच ग्रामस्थ मंडळाचे सल्लागार कल्पेश ठाकूर उपस्थित होते.

# सानपाडा नोडमधील गृहनिर्माण सोसायट्यांत धुरीकरणाची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सानपाडा नोडमध्ये गृहनिर्माण सोसायटीच्या अंतर्गत आवारात धुरीकरण करण्याची लेखी मागणी अखिल भारतीय माथाडी संघटनचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष पांडुरंग आमले यांनी महापालिका आयुक्त कैलाश शिंदे यांच्याकडे एका निवेदनातून केली आहे.

आता पावसाळा कोणत्याही क्षणी सुरु होईल. पावसाळ्यात डासांची घनता वाढीस लागते. नवी मुंबई शहराची निर्मिती व विकसिकरणाची प्रक्रिया खाडीअंर्तगत तसेच खाडीशेजारील भागात झालेली आहे. त्यामुळे नवी मुंबईकरांना बाराही महिने डासांचा पर्यायाने साथीच्या आजारांचा सामना करावा लागतो. पावसाळ्यात तर नवी मुंबईत साथीच्या आजारांचा उद्रेक होतो.

पावसाळा कालावधीत महापालिका प्रशासन सोसायटीच्या अंतर्गत भागात धुरीकरण करत नाही. त्यामुळे आपण पावसाळा सुरु होण्यापूर्वीच सानपाडा कॉलनी, सानपाडा गाव, सानपाडा पामबीच परिसर येथील गृहनिर्माण सोसायटीच्या आवारात धुरीकरण अभियान राबवावे, .साथीच्या आजारांचा सामना करावा लागू नये यासाठी महापालिका प्रशासनातील संबंधितांना गृहनिर्माण सोसायटीच्या अंर्तगत भागात धुरीकरण करण्याचे निर्देश देण्याची मागणी महापालिका आयुक्तांकडे केली आहे.

# पर्यावरण वाचविण्यासाठी हवामान समन्वय समितीची गरज

**नवी मुंबई : बातमीदार**

"प्रतिवर्षी ५ जून रोजी साजरा केला जाणारा जागतिक पर्यावरण दिन हा केवळ एकदिवसीय वार्षिक सोपस्कार किंवा सरकारी उत्सव ठरता कामा नये. प्रशासनाने वृक्षारोपणाचे केवळ कागदी घोडे न नाचवता, मागील १० वर्षांत लावलेल्या झाडांपैकी किती झाडे प्रत्यक्षात जिवंत आहेत याचे आत्मचिंतन करावे असे म्हणत सजग नागरी मंचाने हवामान समन्वय समिती स्थापन करण्याची मागणी नवी मुंबईतील सर्वच प्राधिकरणांकडे केली आहे.

भविष्यात नागरिकांवर ऑक्सिजन सिलेंडर पाठीवर घेऊन फिरण्याची वेळ प्रशासनाने येऊ देऊ नये," असा तीव्र इशारा 'सजग नागरिक मंच, नवी मुंबई'ने दिला आहे.पर्यावरण दिनाचे औचित्य साधून मंचाच्या वतीने नवी मुंबई महानगरपालिका , सिडको आणि वन विभागाला एक सविस्तर निवेदन सादर केले आहे.निवेदनात म्हटले आहे की, नवी मुंबईतील पर्यावरण आणि विकास सिडको, पालिका आणि वन विभाग या तीन वेगवेगळ्या संस्थांमध्ये विभागला गेला आहे. या तिन्ही संस्थांमध्ये कोणताही ताळमेळ नसल्याने एका विभागाचा निर्णय दुसऱ्या विभागाच्या कामात खोडा घालतो आणि निसर्गाचे नुकसान होते. यासाठी शहरात तातडीने सर्व यंत्रणांचा समावेश असलेली 'नवी मुंबई हवामान समन्वय परिषद' स्थापन करण्याची मागणी सजग नागरिक मंचने केली आहे.



काँक्रिटीकरणामुळे शहरात पूर आणि उष्णतेची लाट शहरात सुरू असलेल्या अनिर्बंध सिमेंट रस्त्यांच्या कामांवर मंचाने तीव्र आक्षेप घेतला आहे. काँक्रिटीकरणामुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरत नसून भूजल पातळी गंभीररीत्या खालावली आहे. तसेच 'अर्बन हीट आयलंड इफेक्ट'मुळे शहराच्या तापमानात मोठी वाढ होत आहे. पावसाळ्यात पाणी जमिनीत न मुरल्याने 'फ्लॅश फ्लड' (तातडीने पूर येणे) सारख्या समस्या निर्माण होत आहेत. यावर उपाय म्हणून पाणी मुरवणारे रस्ते तयार करण्याचे धोरण अवलंबणे गरजेचे आहे. टेकड्यांचे रक्षण: पारसिक आणि बेलापूर टेकड्यांवरील उत्खनन व अतिक्रमणे रोखून त्यांना इको सेन्सिटिव्ह नो डेव्हलपमेंट झोन' घोषित करावे. डच तंत्रज्ञानाच्या होल्डिंग पाँड्समधील गाळ उपसा करण्यासाठी सिडको व पालिकेने संयुक्त मोहीम आखावी. डीपीएस लेक, एनआरआय आणि टी.एस. चाणक्य पाणथळ क्षेत्रांना मॅंग्रोव्हज आणि फ्लेमिंगो संरक्षणासाठी कायदेशीर कवच द्यावे.

दरवर्षी पालिकेने स्वतंत्र 'क्लायमेट बजेट' मांडावे आणि नागरिकांसाठी 'सार्वजनिक हवामान डॅशबोर्ड' सुरू करावा. नवी मुंबई शहरासाठी खरे पर्यावरण तज्ञ असणाऱ्या तज्ञांची समिती स्थापन करावी आणि कुठलाही नवीन विकास प्रोजेक्ट मंजूर करण्यापूर्वी पर्यावरण समितीचे ना हरकत प्रमाणपत्र अनिवार्य करावे.

हवामान बदल हा उद्याचा प्रश्न नसून आजचे जळजळीत वास्तव आहे. जर आपण आताच ठोस कृती केली नाही, तर पुढील पिढ्यांना राहण्यासाठी ही नवी मुंबई राहण्यायोग्य असणार नाही असे मंचाने म्हटले आहे.नवी मुंबई कर नागरिकांना 'सिमेंटचे जंगल' नको, तर 'झाडांचे जंगल' हवे आहे," असे आवाहन सजग नागरिक मंचतर्फे करण्यात आले आहे.

# एपीएमसीतील २७०हून अधिक कामगारांची मोफत आरोग्य तपासणी

**नवी मुंबई : बातमीदार**

जागतिक तंबाखू विरोधी दिनाचे औचित्य साधत युनियन बँक ऑफ इंडिया आणि मणिपाल सिगना यांच्या संयुक्त विद्यमाने कृषी उत्पन्न बाजार समिती नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या मोफत आरोग्य तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिराचा लाभ एपीएमसीमधील माथाडी कामगार, वाहतूकदार, व्यापारी आणि कर्मचाऱ्यांसह २७० हून अधिक जणांनी घेतला.



शिबिराचे उद्घाटन मुंबईचे सहसचिव मंदार साळवी, युनियन बँक ऑफ इंडियाचे मुंबई विभागाचे मुख्य महाव्यवस्थापक शिबिरजा प्रसाद दास आणि वाशी विभागाचे क्षेत्रीय प्रमुख राजेश मिश्रा यांच्या हस्ते झाले.यावेळी तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाद्वारे उपस्थितांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. तसेच तंबाखू सेवनामुळे होणारे गंभीर आजार, त्याचे दुष्परिणाम आणि त्यापासून बचावाचे उपाय याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. उपस्थितांना तंबाखूमुक्तीचा संदेश देत आरोग्याविषयी जागरूक करण्यात आले.हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी युनियन बँक ऑफ इंडियाच्या वाशी शाखेचे मुख्य व्यवस्थापक दिग्विजय शेखर यांनी विशेष नियोजन केले.

# उद्या उरणमध्ये माहिती अधिकार कार्यकर्ता प्रशिक्षण कार्यशाळा

**उरण: बातमीदार**

माहिती अधिकार कार्यकर्ता संघ उरण तालुकाच्यावतीने




उरण तालुक्यातील माहिती अधिकार कार्यकर्ता संघाच्या सदस्यांसाठी तसेच नवीन नोंदणीसाठी फॉर्म भरलेल्या कार्यकर्त्यांसाठी शनिवार दिनांक ६ जून रोजी संध्याकाळी ठिक ५ वाजता एकदंत अपार्टमेंट उरण शहर येथे विशेष विचारविनिमय बैठक व प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आले आहे.

या कार्यशाळेमध्ये विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.माहिती अधिकार कायद्याचा प्रभावी वापर, कार्यकर्त्यांना येणाऱ्या अडचणी व त्यांचे निराकरण, अर्ज, अपील व तक्रार प्रक्रियेबाबत मार्गदर्शन, संघटनात्मक कामकाज व पुढील नियोजन, नवीन कार्यकर्त्यांसाठी प्रशिक्षण व मार्गदर्शन अशा विविध विषयावर मार्गदर्शन करण्यात येणार आहे .तरी उरण तालुक्यातील सर्व माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी व इच्छुक नागरिकांनी अधिक माहितीसाठी खालील क्रमांकांवर संपर्क साधावा व जास्तीत जास्त मोठया संख्येने या कार्यशाळेत सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# नेरूळ येथील शुभम तापकीर यांची उल्लेखनीय कामगिरी



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नेरुळ सेक्टर-६ येथील रहिवासी शुभम मोहन तापकीर यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोग ( एम पी एस सी) आयोजित सहाय्यक नगर रचनाकार, श्रेणी-१ (महाराष्ट्र शासन) पदाच्या मुलाखतीत संपूर्ण महाराष्ट्रातून प्रथम क्रमांक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

या यशाबद्दल शिवसेना शिंदे गटाचे माजी नगरसेवक रतन मांडवे, जेष्ठ शिवसैनिक महादेव पवार यांनी शुभम तापकीर यांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांचे अभिनंदन केले तसेच पुढील शासकीय सेवेसाठी व उज्ज्वल भविष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

२०२२ मध्ये आर्किटेक्चरचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी उच्च शिक्षण घेत असतानाच दोन वर्षे ज्युनियर आर्किटेक्ट म्हणून कार्य केले. २०२५ मध्ये मास्टर्सचे शिक्षण पूर्ण करत नोकरी आणि अभ्यास यांचा समतोल राखून पहिल्याच प्रयत्नात एम पी एस सी परीक्षा उत्तीर्ण होण्याचा मान मिळवला.

# चिरले परिसरात अवजड वाहनांच्या विरुद्ध दिशेने वाहतुकीमुळे अपघात

**उरण : बातमीदार**

पनवेल-जेएनपीटी महामार्गावरील उरण मधील चिरले परिसरात वैष्णो लॉजिस्टिक या आस्थापने अंतर्गत चालणाऱ्या अवजड वाहनांची मोठ्या प्रमाणात विरुद्ध दिशेने वाहतूक सुरू असल्याचे निदर्शनास येत आहे. सदर बेकायदेशीर वाहतुकीमुळे परिसरात वाहतूक कोंडीचे प्रमाण वाढले असून स्थानिक नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे.



तसेच विरुद्ध दिशेने धावणाऱ्या अवजड वाहनांमुळे गंभीर अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली असून नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होत आहे. परिसरातील शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक तसेच दैनंदिन प्रवास करणाऱ्या नागरिकांना याचा विशेष त्रास होत आहे.

तरी सदर प्रकरणाची तात्काळ दखल घेऊन वैष्णो लॉजिस्टिक अंतर्गत चालणाऱ्या अवजड वाहनांच्या विरुद्ध दिशेने होणाऱ्या वाहतुकीवर कठोर कारवाई करण्यात यावी तसेच भविष्यात अशा प्रकारांना आळा बसण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्यात याव्यात अशी मागणी स्थानिकांनी वाहतूक विभागाकडे केली आहे.


आज पर्यंत उरण मध्ये बेकायदेशीर व अवैध वाहतूक मुळे अनेक जणांचे विनाकारण मृत्यू झाले आहे. तर काही ठिकाणी अपघात होऊन महत्वाचे हात पाय कायमचे निकामी झाले आहेत. अपघातामुळे अनेकांचे आयुष्य उद्धवस्त झाले आहे.

त्यामुळे गोर गरीब जनतेची, नागरिकांची मागणी व त्यांच्या समस्या लक्षात घेता सदर समस्या त्वरित सुटली नाही तर नागरिकांचा मोठा उद्रेक होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनाने वेळीच यावर त्वरित कारवाई करण्याची व कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे.

# श्री ज्येष्ठराज सिद्धिविनायक गणपती मंदिर देवस्थानचा ३३१वा वर्धापन दिन

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल मधील प्रसिद्ध आणि पुरातन



अशा श्री ज्येष्ठराज सिद्धिविनायक गणपती मंदिर देवस्थान (कापड बाजार जोशी आळी) पनवेल चा ३३१ वा वर्धापनदिन मोठ्या उत्साहात व विविध धार्मिक कार्यक्रमाद्वारे आज संपन्न झाला.

या निमित्ताने आज पहाटे पासूनच पुण्याहवाचन आणि रुद्रघनपाठाचा मोठा धार्मिक विधी संपन्न झाला . त्याच प्रमाणे भाविकांनी देवळात दर्शनाला येऊन पुढे महाप्रसादाचा लाभ घेतला .

या देवस्थांनामार्फत वर्ष भर विविध सामाजिक बांधिलकीचे उपक्रम राबविण्यात येत असल्याची माहिती देवस्थानचे ट्रस्टी प्रथमेश चंद्रशेखर सोमण यांनी दिली.

# ज्येष्ठ नागरिकांचे सेवासुविधा पुरवण्यासाठी निवेदन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सानपाडा सोनखार (पामबीच )मधील जेष्ठ नागरिक लाफिंग क्लब यांनी नवी मुंबई मनपा मुख्यालयात गुरुवारी उपमहापौर दशरथ भगत यांची भेट घेऊन विविध सेवा - सुविधा उपलब्ध व्हाव्यात अशी निवेदनात मागणी केली.

यावेळी भेटी दरम्यान जेष्ठ नागरिक व लाफिंग क्लब मेंबर्स यांनी सानपाडा पश्चिम परिसरातील दर्शनी भागात बाकडे बसवण्यात यावेत तसेच सोनखार परिसरात ई-टॉयलेट व बैठकीसाठी बाकडे बसविण्याबाबतचेनिवेदन दिले. भगत यांनी सदर दोन्ही सुविधांच्या पूर्ततेबाबतीत मनपा संबंधित विभागाच्या प्रमुखांस निर्देश दिले आहेत. बैठकी साठी बाकडे पुढील काही दिवसांत बसविण्यात येतील तर प्रस्तावित जागेवर ई-टॉयलेट निर्मिती प्रक्रियेसाठी आवश्यक पूर्तता त्वरित करण्यात येणार असल्याचे उपमहापौर दशरथ भगत यांनी सांगितले.



# टीईटी परीक्षेच्या आयोजनासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली सनियंत्रण समिती गठीत

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्यातील शाळांमध्ये पहिली ते आठवीसाठी नियुक्त असलेल्या ज्या शिक्षकांचा पाच वर्षांहून अधिक सेवाकाळ शिल्लक आहे, अशा शिक्षकांसाठी टीईटी परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी ३१ ऑगस्ट २०२६ची मुदत सर्वोच्च न्यायालयाकडून देण्यात आला आहे. त्यानुसार रायगड जिल्ह्यात २८ जून रोजी टीईटी परिक्षेचे आयोजन करण्यात येणार आहे. या परिक्षेच्या तयारीसंदर्भात तसेच सनियंत्रण समिती गठीत करण्यासंदर्भात बुधवारी ( दि.३ ) जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक पार पडली.



राज्यातील शिक्षकांसाठी आता टीईटी परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य करण्यात आले आहे. त्यानुसार राज्यातील सर्व जिल्हा मुख्यालयी २८ जून रोजी ही परीक्षा होणार आहे. रायगड जिल्ह्यातील ९ केंद्रांवर ही परीक्षा होणार असून एकूण ५ हजार ४६८ शिक्षक ही परीक्षा देणार आहेत. यामध्ये पेपर १साठी १ हजार १० विद्यार्थी, पेपर २ साठी १ हजार ९१५ शिक्षक तर दोन्ही पेपरसाठी २ हजार ५४३ शिक्षक प्रविष्ठ आहेत.परीक्षा केंद्रांवर कोणताही गैरप्रकार घडू नये यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी समिती सदस्यांना दिल्या.

या परीक्षेसंदर्भात बुधवारी जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. जिल्हास्तरावर सनियंत्रण समिती गठीत करण्यात आली. या समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी किशन जावळे असतील. उपाध्यक्ष रायगड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, सदस्यांमध्ये जिल्हा पोलिस अधीक्षक आँचल दलाल, राजिप शिक्षणाधिकारी (माध्यमिक) महारूद्र नाळे, राजिप शिक्षणाधिकारी (योजना) आशा गरूड, राजिप शिक्षणाधिकारी (प्राथमिक) ललिता दहितुले व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य असणार आहेत. बैठकीसाठी सदस्य पोलीस आयुक्त कार्यालयामधील अभिजीत अभंग, शिक्षणाधिकारी पनवेल महानगरपालिका रमेश चव्हाण, राजिप उपशिक्षणाधिकारी सुनिल भोपळे, संतोष शेडगे, प्रतिनिधी उपस्थित होते.

## गॅस वाहिनीच्या कामामुळे अपघाताचा धोका

**खोपोली : प्रतिनिधी**

सावरोली खारपाडा राज्य मार्गावर गॅसवाहिनीसाठी खोदलेली साईड पट्टी, मातीचा ढिगारा आणि प्रचंड आकाराचे दगड यामुळे जीवघेण्या अपघाताची टांगती तलवार प्रवाशांवर आहे.

सावरोली खारपाडा राज्य मार्गावर रसायणी हद्दीत लोहप गावानजीक गॅसवाहिनीसाठी खोदाई काम सुरू आहे. आधीच अरुंद रस्ता त्यात ठेकेदारांने काम करताना कोणत्याही प्रकारची सुरक्षा उपाययोजना केलेली नाही. खोदाई करताना निघालेली माती आणि दगड रस्त्यालगत टाकण्यात आले आहेत.या मार्गावर ट्रक, कंटेनर सारख्या अवजड वाहनांची वाहतूक अव्याहतपणे सुरू असल्याने पादचारी, दुचाकीस्वार याना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतो.

रात्रीच्या अंधारात तर काम सुरू असलेल्या ठिकाणी अंदाज येत नसल्याने जीवघेणा अपघात घडण्याची शक्यता वाढली आहे. ठेकेदारांने बॅरिकेड्स, सुरक्षा पट्टी तसेच सूचना फलक लावण्याची तसदी घेतलेली नाही.



## कालकथित भिमाबाई मोरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त रक्तदान शिबिर

**चौक: प्रतिनिधी**

कालकथित भिमाबाई बारकू मोरे यांचे ५ व्या स्मृती दिनानिमित्ताने महारक्तवीर दाता राजाभाऊ कोठारी यांच्या मार्गदर्शनाखाली ५४० वे रक्तदान शिबिराचे आयोजन सिद्धार्थनगर बुद्धविहार कडाव येथे आयोजित करण्यात आले होते.



याप्रसंगीएकूण ३० रक्तदात्यांनी रक्तदान करुन राष्ट्रीय, सामाजिक व मानवतावादी कार्य करुन सहकार्य केले त्याबद्दल सर्व रक्तदात्यांचे आभार व्यक्त करण्यात आले. याप्रसंगी सर्व रक्तदात्यांना प्रशस्ती पत्र व हापूस आंब्याचे रोप देऊन सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी अन्नदान करण्यात आले.याप्रसंगीकृष्णा जाधव, जयवंत म्हसे व मनोज निकम उपस्थित होते.सर्व उपस्थित मान्यवरांचे ही शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.उपस्थित सर्व मान्यवरांचे मनःपुर्वक आभार.

याप्रसंगी संतोष बारकू मोरे यांनी सर्व समाजा पुढे एक चांगला आदर्श उभा केला या वेळी मोरेनी अन्नदान, रक्तदान व पर्यावरण साठी हापूस आंब्याची रोपे देऊन त्रिवेणी संगम रुपी आदर्श निर्माण केला. याप्रसंगी रक्तसंकलनाचे काम बदलापूर येथील माया रक्त केंद्राचे डॉक्टर,टेक्निशियन व सर्व आरोग्य सेवकांनी सहकार्य केले.

## 'गोजातीय प्रजनन व नियमन' विषयावर कार्यशाळा

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

राज्यातील खासगी कृत्रिम रेतन सेवादात्यांनी केलेल्या कामाची नोंदणी भारत पशुधन प्रणालीवर करणे आवश्यक आहे. त्या माध्यमातून राज्यातील पशुवैद्यकीय सेवेची संख्यात्मक माहिती उपलब्ध होण्यास मदत होणार असून, त्यामुळे राज्यातील पशुवैद्यकीय सेवांचा दर्जा व गुणवत्ता आणखी वृद्धींगत होण्यास मदत होणार आहे, असे प्रतिपादन पशुसंवर्धन आयुक्त डॉ.किरण पाटील यांनी केले.



औंध येथील पशुसंवर्धन आयुक्तालयातील कामधेनू हॉल येथे 'गोजातीय प्रजनन व नियमन' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. मा.आयुक्त पशुसंवर्धन तथा अध्यक्ष, महाराष्ट्र गोजातीय प्रजनन व नियमन प्राधिकरण डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.) यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या या कार्यशाळेत विविध तज्ज्ञ अधिकारी, सेवा पुरवठादार आणि संस्थात्मक प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन कायदा व नियमांची राज्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करणे, हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता. यासोबतच कृत्रिम रेतन (AI) सेवा आणि नॅशनल डिजिटल लाइव्हस्टॉक मिशन (NDLM) अंतर्गत डिजिटल ट्रॅकिंगच्या तांत्रिक एकत्रीकरणावर तसेच राज्य व केंद्र सरकारच्या भविष्यकालीन धोरणांवर कार्यशाळेत सविस्तर चर्चा करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात पशुसंवर्धन विभागाचे सहआयुक्त व प्राधिकरणाचे सदस्य डॉ.देवेंद्र जाधव यांच्या प्रास्ताविकाने झाली.

डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.) यांनी 'महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन कायदा व नियमांची प्रभावी अंमलबजावणी' या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. कृत्रिम रेतन सेवा आणि NDLM डिजिटल ट्रॅकिंग आवश्यक असल्याने या तांत्रिक बाबींवर त्यांनी विशेष भर दिला.

राज्यामध्ये उच्च उत्पादनक्षम पशुधनाच्या संख्यात्मक वाढीसाठी पशुसंवर्धन विभाग प्रयत्नशील आहे. त्यासाठी कृत्रिम रेतनाच्या कार्यात अधिकधीक पारदर्शकता निर्माण करणे आवश्यक आहे. खाजगी कृत्रिम सेवादातांनी याकरिता पशुसंवर्धन विभागाच्या सोबतीने काम केले पाहिजे. या कामात खाजगी कृत्रिम सेवादातांना पशुसंवर्धन विभाग सर्वतोपरी मदत करेल, असे आश्वासनही उपस्थितांना डॉ. किरण पाटील यांनी दिले.

तज्ज्ञांचे सादरीकरण आणि तांत्रिक सत्र कार्यशाळेच्या उत्तरार्धात विविध संस्थांच्या तज्ज्ञांनी आपले अनुभव आणि तंत्रज्ञान याविषयी सादरीकरण केले.

बायफ, पुणे येथील डॉ. जयंत खडसे यांनी गोजातीय पैदाशीतील बायफच्या अनुभवांवर प्रकाश टाकला. चितळे–ABS जेनस प्रा. लि. चे डॉ. परिक्षित देशमुख यांनी 'जेनोमिक्स आणि सेक्स्ड सीमेन' या प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करून गोवंश उत्पादकता व पैदास कशी सुधारावी, याबद्दल तांत्रिक माहिती दिली.

# शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी वाहतूक आणि आपत्कालीन व्यवस्थेचे काटेकोर नियोजन

**माणगाव : प्रतिनिधी**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त किल्ले रायगडावर लाखो शिवभक्त, इतिहासप्रेमी आणि पर्यटक दाखल होण्याची शक्यता लक्षात घेऊन रायगड जिल्हा प्रशासन, रायगड पोलीस, महसूल विभाग तसेच विविध शासकीय यंत्रणांनी व्यापक नियोजन केले आहे. सोहळ्यादरम्यान नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले असून सुरक्षा यंत्रणा, नियंत्रण कक्ष, आपत्कालीन प्रतिसाद पथके आणि वाहतूक व्यवस्थापनासाठी विशेष पथके सज्ज ठेवण्यात आली आहेत.

शिवराज्याभिषेक दिन हा महाराष्ट्राच्या इतिहासातील अत्यंत अभिमानाचा आणि प्रेरणादायी दिवस मानला जातो. दरवर्षी मोठ्या उत्साहात हा सोहळा साजरा केला जात असला तरी यंदा भाविकांची संख्या अधिक राहण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे रायगड परिसरात वाहतूक, सुरक्षा, आरोग्य सेवा, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, पार्किंग आणि आपत्कालीन सेवांसाठी विशेष तयारी करण्यात आली आहे.

विशेष म्हणजे रायगड किल्ल्यावर जाण्यासाठी माणगाव हे प्रमुख वाहतुकीचे केंद्र मानले जाते. मुंबई, पुणे तसेच कोकणातील विविध भागांतून येणारे लाखो शिवभक्त माणगावमार्गे रायगडकडे रवाना होत असल्याने राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक सुरळीत ठेवण्याचे मोठे आव्हान प्रशासनासमोर आहे. याच पार्श्वभूमीवर माणगाव, इंदापूर, निजामपूर आणि लोणेरे या महत्त्वाच्या ठिकाणी वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी अतिरिक्त पोलीस अधिकारी व कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. गर्दीच्या काळात वाहतुकीचे नियमन, पार्किंग व्यवस्थापन आणि आपत्कालीन मार्ग मोकळे ठेवण्यासाठी विशेष दक्षता घेण्यात येणार आहे.

रायगड पोलीस दलाकडून वाहतूक नियंत्रणासाठी स्वतंत्र पथके नियुक्त करण्यात आली असून प्रमुख मार्गांवर पोलीस अधिकारी आणि कर्मचारी सतत गस्त घालणार आहेत. वाहनचालकांनी निश्चित करण्यात आलेल्या मार्गांचा वापर करावा, वाहन पार्किंगसाठी निर्धारित ठिकाणांचाच उपयोग करावा आणि पोलिसांच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

तसेच शिवभक्तांनी शिस्त, संयम आणि जबाबदारीचे भान ठेवून प्रशासन व पोलीस यंत्रणेला सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. गर्दीच्या ठिकाणी धक्काबुक्की टाळणे, संशयास्पद वस्तू अथवा व्यक्ती आढळल्यास तत्काळ पोलिसांना माहिती देणे आणि लहान मुले, महिला तसेच ज्येष्ठ नागरिकांची विशेष काळजी घेणे आवश्यक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.


छत्रपती शिवाजी महाराजांच्या पवित्र राजधानीत आयोजित या ऐतिहासिक सोहळ्याचा आनंद घेताना प्रत्येक शिवभक्ताने नियमांचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन रायगड जिल्हा प्रशासन आणि रायगड पोलीस दलाच्या वतीने करण्यात आले आहे. शिवराज्याभिषेक सोहळा सुरक्षित, शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडावा यासाठी प्रशासन अक्षरशः "डोळ्यात तेल घालून" काम करत असल्याचे चित्र सध्या रायगड जिल्ह्यात दिसून येत आहे.

## माणगाव पतसंस्थेतील सभासदांच्या पाल्यांचा गुणगौरव सोहळा

**माणगाव : प्रतिनिधी**

सहकार क्षेत्रात माणगाव तालुक्यासह रायगड जिल्ह्यात नावलौकिक कमाविलेल्या माणगाव ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या,उतेखोल ता.माणगाव या संस्थेतील शैक्षणिक वर्ष २०२५–२६ या वर्षातील दहावी – बारावी व पदवी – पदविका,पदवीत्तर,शिष्यवृत्ती प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणाऱ्या सभासदांच्या पाल्यांचा गुणगौरव सोहळा सलग तिसऱ्या वर्षी लवकरच आयोजित करण्यात येणार आहे. तरी संस्थेच्या सभासदांनी आपल्या पाल्याच्या गुणपत्रिकेची झेरॉक्स प्रत संस्था कार्यालय चौधरी कॉम्प्लेक्स निजामपूर रोड,माणगाव या ठिकाणी दि.२० जून २०२६ पर्यंत सादर करावी असे आवाहन संस्थेचे चेअरमन आनंद यादव यांनी केले आहे.

माणगाव ग्रामीण पतसंस्थेची स्थापना सन १९९८ साली करण्यात येऊन सन १९९९ ला संस्थेच्या कामकाजाची खऱ्या अर्थाने सुरुवात करण्यात आली. या संस्थेने अल्पावधीत गरुड भरारी घेतली आहे. संस्थेचा रौप्य महोत्सवी वर्ष नुकताच थाटात साजरा करण्यात येऊन यावर्षी संस्थेची इंदापूर शाखा सुरु करण्यात आली आहे. संस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्षांपासून सभासदांना दरवर्षी संस्थेतर्फे साखर देऊन त्यांची दिवाळी गोड करण्यात यते. संस्थेतर्फे नेहमीच गुणवंतांचा आदर सन्मान करण्यात येत असतो. यावर्षी संस्थेतील सभासद यांचे दहावी – बारावी,पदवी – पदविका,पदवीत्तर,शिष्यवृत्ती उत्तीर्ण पाल्यांचा त्यांचे कौतुक म्हणून गुणगौरव सोहळा आयोजित केला आहे.



बोर्ली पंचतन : निसर्गाच्या सानिध्यात वसलेले नयनरम्य असे श्रीवर्धन तालुक्यातील दिघी गाव. (छाया : अमेय नाझरे, बोर्ली पंचतन)

## पिगोंडेच्या साई म्हात्रेची इस्त्रो भेटीसाठी निवड; ग्रामपंचायतीकडून सत्कार

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे जवळील पिगोंडे गावातील रायझिंग स्टार विद्यार्थी कुमार साई योगेश म्हात्रे याची भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्त्रो) भेटीसाठी निवड झाल्याने गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. गुरुकुल एज्युकेशन सोसायटीच्या राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षेतील उल्लेखनीय यशाच्या जोरावर साईला ही संधी प्राप्त झाली आहे.

या यशाबद्दल रोहा पंचायत समिती सदस्या समृद्धी संतोष कोळी आणि पिगोंडेचे सरपंच संतोषभाई जनार्दन कोळी यांनी साईचा रोख ५ हजार रुपये, शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन गौरव केला.

यावेळी समृद्धी कोळी यांनी सांगितले की, इस्त्रोसारख्या जागतिक दर्जाच्या संस्थेला भेट देण्याची संधी मिळणे ही अभिमानाची बाब असून तेथील आधुनिक अंतराळ तंत्रज्ञान, उपग्रह प्रक्षेपण, हवामान अंदाज, दळणवळण व्यवस्था आणि अवकाश संशोधनाची माहिती साईला प्रत्यक्ष अनुभवता येणार आहे. या संधीचा पुरेपूर लाभ घेऊन भविष्यात आणखी मोठे यश संपादन करावे, अशा शुभेच्छाही त्यांनी दिल्या.

कोल्हापूर येथील गुरुकुल एज्युकेशन सोसायटीतर्फे २०११ पासून इयत्ता १ ली ते ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षा घेतली जाते. रायगड जिल्ह्यात प्रथमच ही परीक्षा अशोक अहिरे यांच्या देखरेखीखाली घेण्यात आली होती. यामध्ये जिल्ह्यातील तब्बल ३,६१७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

याप्रसंगी शिक्षक सोनल पाटील, कमलाकर लेंडी, ग्रामपंचायत कर्मचारी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## शिवभक्तांसाठी ढालघर आणि निजामपूर मार्ग ठरतोय वरदान

**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड किल्लयावर शुक्रवार दिनांक ५ आणि शनिवार ६ रोजी ३५२ वा छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक सोहळयाला उपस्थित राहण्यासाठी दरवर्षी लाखो शिवभक्त रायगडाच्या दिशेने निघतात. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून, तसेच मुंबई आणि पुण्यासारख्या महानगरांतून येणाऱ्या शिवप्रेमींसाठी रायगड ही केवळ पर्यटनस्थळ नसून श्रद्धा, स्वाभिमान आणि इतिहासाची पवित्र भूमी आहे. अशा वेळी रायगडाकडे जाणारा माणगाव–ढालघर आणि निजामपूर मार्ग हजारो शिवभक्तांसाठी खऱ्या अर्थाने जीवनवाहिनी ठरत आहे.

रायगड किल्लयावर जाण्यासाठी पारंपरिकरित्या महाड मार्गाचा वापर केला जात असला, तरी गेल्या काही वर्षांत माणगाव येथील ढालघर जोड रस्ता आणि निजामपूर मार्गे थेट रायगडाच्या पायथ्याशी पोहोचण्याचा पर्याय अधिक लोकप्रिय झाला आहे. या मार्गामुळे शिवभक्तांचे सुमारे २० ते २५ किलोमीटर अंतर कमी होते, तसेच प्रवासाच्या वेळेतही मोठी बचत होते. परिणामी, मुंबई–पुण्यातून येणारे बहुसंख्य शिवभक्त महाड मार्ग टाळून माणगाव आणि निजामपूर मार्गाला प्राधान्य देत आहेत.

राज्याभिषेक सोहळ्याच्या काळात या मार्गावर वाहनांची मोठी वर्दळ दिसून येते.पहाटेपासूनच भगवे झेंडे फडकवत, शिवरायांच्या जयघोषात निघालेली वाहने माणगाव शहरातून रायगडाच्या दिशेने जाताना पाहायला मिळतात. अनेक कुटुंबे, युवक मंडळे, शिवप्रेमी संघटना आणि दुर्गप्रेमी याच मार्गाने गडाच्या पायथ्याशी पोहोचतात. त्यामुळे माणगाव शहर हे राज्याभिषेक सोहळयाच्या काळात शिवभक्तांच्या स्वागताचे प्रवेशद्वार बनते.

स्थानिक नागरिकांच्या मते, ढालघर–निजामपूर मार्गामुळे केवळ वेळ आणि इंधनाची बचत होत नाही, तर प्रवास अधिक सोयीस्कर आणि सुरक्षितही होतो. रायगडाकडे जाणाऱ्या हजारो वाहनांमुळे या मार्गावरील छोट्या गावांमध्येही आर्थिक चैतन्य निर्माण होते. हॉटेल, भोजनालये, पेट्रोल पंप, किराणा दुकाने आणि स्थानिक व्यावसायिकांच्या व्यवसायाला चालना मिळते.

# अफगाणिस्तानविरुद्धच्या वन डे मालिकेतून विराट कोहली बाहेर

## आयपीएलमधील दुखापतीचा फटका

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील मालिकांना लवकरच सुरुवात होणार आहे. पहिला कसोटी सामना ६ जून रोजी सुरू होईल. त्यानंतर १३ जूनपासून तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका सुरू होईल. बीसीसीआयने आयपीएल सुरू असतानाच या दोन्ही मालिकांसाठी भारतीय संघाची घोषणा आधीच केली आहे. दरम्यान, अचानक एक मोठी बातमी समोर आली आहे. भारतीय संघाचा स्टार खेळाडू विराट कोहली वन डे मालिकेतून बाहेर पडला असल्याचे समोर आले आहे.



विराट कोहली बऱ्याच कालावधीनंतर टीम इंडियाकडून खेळण्याची तयारी करत होता. मात्र, कोहली आणि त्याच्या चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे. आता विराट कोहली हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे अफगाणिस्तानविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेतून बाहेर पडला आहे. काही दिवसांपूर्वी विराट कोहली आयपीएलमध्ये आरसीबीकडून खेळत होता. गुजरात टायटन्सविरुद्धच्या अंतिम सामन्यात कोहलीने नाबाद ७५ धावांची एक शानदार खेळी केली आणि षटकार मारून आपल्या संघाला सलग दुसऱ्यांदा चॅम्पियन बनण्यास यशस्वीरित्या मदत केली.

आरसीबी आणि गुजरात टायटन्स यांच्यातील फायनलमध्ये फलंदाजी करत असताना विराट कोहलीला दुखापतीची त्रास जाणवत होता. सामन्यादरम्यान बऱ्याच वेळेस फिजिओ विराटच्या दुखापतीसाठी मैदानात आलेले पाहायला मिळाले. यानंतर आता विराट दुखापतीमुळे मालिकेतून बाहेर झाल्याचे समोर येत आहे.

**भारत-अफगाणिस्तान वन डे मालिका वेळापत्रक**

- *पहिला वन डे सामना: १३ जून धरमशाला*
- *दुसरा वन डे सामना: १७ जून धरमशाला*
- *तिसरा वन डे सामना: २० जून चेन्नई*

**अफगाणिस्तानविरुद्ध वन डे मालिकेसाठी भारताचा संघ**

शुबमन गिल (कर्णधार), रोहित शर्मा, विराट कोहली (दुखापत), श्रेयस अय्यर (उपकर्णधार), केएल राहुल (यष्टीरक्षक), इशान किशन (यष्टीरक्षक), हार्दिक पांड्या, नितीश कुमार रेड्डी, वॉशिंग्टन सुंदर, कुलदीप यादव, अर्शदीप सिंग, प्रसिध कृष्णा, प्रिन्स यादव, गुरनूर ब्रार. हर्ष दुबे.

पै. अन्वर बुराण स्मृतिचषक क्रिकेट स्पर्धा

# फायटर्स क्रिकेट अकॅडमीला विजेतेपद

**अलिबाग : प्रतिनिधी**

झुंझार युवक मंडळ पोयनाड आयोजित पै. अन्वर बुराण स्मृतिचषक १४ वर्षांखालील मुलांच्या एकदिवसीय ४० षटकांच्या क्रिकेट स्पर्धेत फायटर्स क्रिकेट अकॅडमी माणगाव संघाने दमदार खेळाचे प्रदर्शन करत विजेतेपद पटकावले. कोंढाळकर्स क्रिकेट अकॅडमी लोधीवली संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. अंतिम सामन्याचा सामनावीर म्हणून पार्थ मस्केची निवड करण्यात आली.



स्टार प्रतिस्पर्धी खेळाडूचा पुरस्कार सोहम अडसूळ याला मिळाला. उत्कृष्ट क्षेत्ररक्षकाचे पारितोषिक रयान जोशी व सुयश पारंगे यांना विभागून देण्यात आले. दीक्षांत कांबळे याला स्पर्धेचा उत्कृष्ट फलंदाज तर यश पार्टे याला उत्कृष्ट गोलंदाजाचा पुरस्कार मिळाला. स्पर्धेचा मानकरी ओम कवळे ठरला, तर मौल्यवान खेळाडू म्हणून पार्थ मस्के याला गौरविण्यात आले. स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील आठ संघांनी सहभाग घेतला होता. स्पर्धा प्रथम साखळी व त्यानंतर बाद फेरीनुसार आयोजित करण्यात आली होती. एकूण १५ एकदिवसीय सामन्यांचे यशस्वी आयोजन झुंझार युवक मंडळ पोयनाडच्या वतीने करण्यात आले.

स्पर्धेचा अंतिम सामना ३ जून रोजी झुंझार युवक मंडळ पोयनाडच्या मैदानावर खेळला गेला. नाणेफेक जिंकून फायटर्स क्रिकेट अकॅडमी माणगाव संघाने प्रथम फलंदाजी करत निर्धारित ४० षटकांमध्ये २१५ धावा केल्या. यात यश देढे याने सर्वाधिक ७४ धावांची खेळी केली. त्याला ऋग्वेद जाधवने ५० धावा, तर पार्थ मस्के व ईशान काटे यांनी प्रत्येकी १६ धावा करून साथ दिली. कोंढाळकर्स अकॅडमीकडून सोहम अडसूळ व यश पार्टे यांनी प्रत्येकी ३, तर स्वाभिमान बेज याने २ बळी घेतले. २१६ धावांचे लक्ष्य घेऊन फलंदाजीला आलेल्या कोंढाळकर्स क्रिकेट अकॅडमीचा डाव ९३ धावांत आटोपला.

शुभंकर मानेने १७ व वेदांत सांगळेने १६ धावा केल्या. फायटर्स माणगाव संघाकडून रयान जोशी व पार्थ मस्के यांनी प्रत्येकी ४ फलंदाजांना बाद केले. फायटर्स क्रिकेट अकॅडमी माणगाव संघाने सामना १२२ धावांनी दणदणीत जिंकत स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. झुंझारचे सचिव किशोर तावडे, अजय टेमकर, राजेंद्र जाधव, तहसीन बुराण, आलिजा बुराण, अ‍ॅड. राजेश जोशी, अ‍ॅड. समीर सुर्वे, अ‍ॅड. पंकज पंडित, रोहित काळे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.

# ओमकार तरमळेने हॅट्ट्रिक घेत घडवला इतिहास

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएल २०२६ स्पर्धा संपल्यानंतर आता मुंबई टी-२० लीग स्पर्धेला सुरुवात झाली आहे. या स्पर्धेत मुंबईतील युवा खेळाडूंना आंतरराष्ट्रीय क्रिकेट गाजवणाऱ्या खेळाडूंसोबत खेळण्याची संधी मिळत आहे. ज्या खेळाडूला आयपीएल स्पर्धेत सनरायझर्स हैदराबादने ३० लाखांची बोली लावून संघात स्थान दिलं, पण संपूर्ण हंगाम बाकावर बसवून ठेवलं त्याच खेळाडूने आता हॅट्ट्रिक घेऊन सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. आकाश टायगर्स संघाविरुद्ध झालेल्या सामन्यात ठाणे ईगल स्ट्रायकर्स संघाचा वेगवान गोलंदाज ओमकार तरमळेने भेदक गोलंदाजी करून या स्पर्धेत हॅट्ट्रिक घेण्याचा कारनामा केला आहे.



शहापूर तालुक्यातील भूमिपुत्र ओमकार तरमळेने मुंबई टी-२० लीग स्पर्धेत हॅट्ट्रिक घेत इतिहास घडवला आहे. या स्पर्धेच्या इतिहासात आतापर्यंत केवळ एकाच गोलंदाजाला हॅट्ट्रिक घेता आली होती. आता शहापूर एक्सप्रेस म्हणून ओळखला जाणारा ओमकार तरमळे हा या स्पर्धेत हॅट्ट्रिक घेणारा दुसराच गोलंदाज ठरला आहे. तर खास रेकॉर्ड असा की ओमकार हा मुंबई टी- २० लीग स्पर्धेत हॅट्ट्रिक घेणारा पहिलाच वेगवान गोलंदाज ठरला आहे. ताशी १४० हून अधिकच्या गतीने गोलंदाजी करणाऱ्या ओमकारने पहिल्या सामन्यातही दमदार गोलंदाजी केली होती.

या सामन्यात ठाणे ईगल स्ट्रायकर्स संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. कर्णधार शार्दुल ठाकूरने घेतलेला हा निर्णय ओमकार तरमळेने सार्थ ठरवला. ओमकार डावातील तिसरे षटक टाकण्यासाठी गोलंदाजीला आला. या षटकातील पहिल्याच चेंडूवर फलंदाजाने चौकार खेचला. पण त्यानंतर ओमकारने दमदार पुनरागमन केलं. त्याने दुसऱ्या, तिसऱ्या आणि चौथ्या चेंडूवर लागोपाठ तीन विकेट्स घेऊन आपली हॅट्ट्रिक पूर्ण केली.

ओमकार तरमळेला आयपीएल २०२६ स्पर्धेसाठी झालेल्या लिलावात सनरायझर्स हैदराबादने ३० लाखांची बोली लावून आपल्या संघात स्थान दिलं होतं. पण प्लेइंग ११ मध्ये स्थान मिळवण्यासाठी स्पर्धा असल्याने त्याला पदार्पण करण्याची संधी मिळाली नाही. पण त्याने मेहनत करणं सोडलं नाही. अनुभवी गोलंदाजांचं मार्गदर्शन त्याला टी-२० मुंबई लीग स्पर्धेत कामी येत आहे. स्पर्धेतील पहिल्याच सामन्यात त्याने ३ गडी बाद केले होते. आकाश टायगर्सविरुद्ध झालेल्या सामन्यातही त्याने चार षटकांत अवघ्या २० धावा खर्च केल्या आणि तीन गडी बाद केले. त्याची या हंगामातील कामगिरी पाहता आगामी आयपीएल हंगामात त्याला खेळण्याची संधी मिळू शकते.

# वैभव सूर्यवंशीच्या खेळीने सचिनही प्रभावित

**मुंबई : प्रतिनिधी**

१५ वर्षीय वैभव सूर्यवंशीने आयपीएल २०२६ स्पर्धेत सर्वच क्रिकेटविश्वाचे लक्ष वेधून घेतले आहे. कमी वयातही तो ज्याप्रकारे स्फोटक फलंदाजी करतो, त्यामुळे अनेक जण त्याचे चाहते झाले आहेत. त्याने १६ सामन्यांतच ७७६ धावा आयपीएल २०२६ स्पर्धेत केल्या. त्याच्या प्रतिभेने मास्टर-ब्लास्टर सचिन तेंडुलकरलाही प्रभावित केले होते.



दरम्यान, वैभवला लवकरात लवकर भारतीय संघात संधी दिली जावी, अशी मागणीही होत आहे. याशिवाय तो कसोटीतही यशस्वी होईल की नाही याबाबतची चर्चा होत आहे. त्याविषयी आता सचिनने त्याचे मत मांडले आहे. नुकताच सचिनला क्रिकइन्फो ऑनर्स पुरस्कार २०२६ सोहळ्यात '२१ व्या शतकातील सर्वोत्तम आंतरराष्ट्रीय फलंदाज' हा पुरस्कार मिळाला. या पुरस्कार सोहळ्यात सचिन बोलत होता.

वैभवला सर्व प्रकारात खेळण्याबाबत सल्ला देताना सचिन म्हणाला की, मी वैभवला इतकेच सांगेल की स्वतःसारखंच राहा. आयुष्यात कोणतीही गोष्ट पहिल्यांदा होत असते. कसोटी क्रिकेटबाबत तो वेळ आणि वय जसे पुढे जाईल तसे तो वेगवेगळ्या आव्हानांना कसं सामोरे जायचे हे शिकेल. त्यामुळे परिस्थितीनुसार त्याची मानसिकताही तयार होईल.

वैभवला कसोटी क्रिकेटमध्ये खेळवण्याबाबत सचिन म्हणाला की, फक्त मीच नाही, तर प्रत्येकाला त्याला कोणत्या तरी टप्प्यावर कसोटी क्रिकेटमध्ये खेळताना पाहायचे आहे. मला माहीत नाही हे कधी होईल, पण उदयोन्मुख प्रतिभेला प्रोत्साहन देण्याची गरज असते.

# गौतम गंभीर-निवडकर्त्यांमध्ये टी-२० कर्णधारपदावरून मतभेद

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

सूर्यकुमार यादवला भारताच्या टी-२० संघाच्या कर्णधारपदावरून काढण्यात आले आहे. सूर्याला पदावरून पायउतार करण्यासाठी कर्णधारपद हा कधीच मुख्य मुद्दा नव्हता. मात्र, गेल्या बराच काळ टी-२० क्रिकेटमधील घसरती कामगिरी पाहता निवड समिती आणि संघ व्यवस्थापनाचा संयम संपल्याचं दिसत आहे. सूर्यकुमार यादवला भारतीय टी-२० संघाच्या कर्णधारपदावरून हटवण्यात येणार असून, सुमारे १८ महिन्यांच्या निराशाजनक कामगिरीनंतर त्याचे संघातील स्थानही धोक्यात आलं आहे.



पण आता पुढचा कर्णधार कोण यावर निवड समिती व गौतम गंभीर यांच्यात द्वंद्व असल्याचं समोर येत आहे.

श्रेयस अय्यर या पदासाठी सर्वात मजबूत दावेदार मानला जात आहे. डिसेंबर २०२३ नंतर त्याने भारतीय टी-२० संघाकडून एकही सामना खेळलेला नसला तरी त्यांच्या नेतृत्वगुणांची सातत्याने चर्चा होत आहे. गेल्या तीन आयपीएल हंगामांत अय्यरने दोन वेगवेगळ्या संघांना अंतिम फेरीत पोहोचवलं आहे. यामध्ये २०२४ मध्ये कोलकाता नाईट रायडर्सला विजेतेपद मिळवून देण्याचाही समावेश आहे. त्यामुळे कर्णधारपदाच्या शर्यतीत त्याचा दावा अधिक मजबूत मानला जात आहे.

भारतीय टी-२० संघाच्या नेतृत्वाचा निर्णय इतका सोपा नसल्याचेही मानले जात आहे. निवडकर्त्यांसमोर अनेक पर्याय उपलब्ध असून, आगामी काळात कोणाच्या खांद्यावर नेतृत्वाची जबाबदारी सोपवली जाते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. काही रिपोर्ट्सनुसार भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर हे श्रेयस अय्यरला टी-२० संघाचे पुढील कर्णधार बनवण्याबाबत पूर्णपणे खात्रीशीर नाहीत.

गौतम गंभीर व अय्यर २०२४ मध्ये कोलकाता नाईट रायडर्सच्या ताफ्याचा भाग होते. त्यावेळी गंभीर संघाचे मार्गदर्शक होते, तर अय्यरने संघाला विजेतेपद मिळवून दिलं होतं. आपल्या योगदानाला पुरेसे महत्त्व मिळाले नसल्याची भावना अय्यरने सार्वजनिकपणे व्यक्त केली होती. दरम्यान, भारतीय टी-२० संघाच्या कर्णधारपदासाठी आणखी एक मजबूत दावेदार म्हणून तिलक वर्माचे नाव समोर येत आहे.

फ्रेंच खुली टेनिस स्पर्धा

# अग्रमानांकित सबालेन्कालाही धक्का

## पिछाडीनंतर श्नायडरचा अनपेक्षित विजय

**पॅरिस : वृत्तसंस्था**

जागतिक क्रमवारीत अग्रस्थानावर असलेल्या अरिना सबालेन्काचे फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेचे जेतेपद पटकावण्याचे स्वप्न पुन्हा अधुरेच राहिले. एक सेट आणि दोन ब्रेक्सची आघाडी घेऊनही तिला रशियाच्या डायना श्नायडरकडून अनपेक्षित पराभव पत्करावा लागला. त्यामुळे फ्रेंच स्पर्धेतील धक्कादायक निकालांची मालिका सुरू राहिली.

माजी विजेती इगा श्वीऑटेक आणि गतविजेती कोको गॉफ याआधीच स्पर्धेबाहेर झाल्याने सबालेन्काला आता जेतेपदासाठी प्रमुख दावेदार मानले जात होते. मात्र, तिला या संधीचा फायदा काही घेता आला नाही. पहिला सेट ६-३ असा जिंकल्यानंतर दुसऱ्या सेटमध्ये ती ४-१ अशी आघाडीवर होती, मात्र त्यानंतर श्नायडरने पुनरागमन करताना सबालेन्काला अक्षरशः धूळ चारली. श्नायडरने शेवटचे दोन सेट ७-५, ६-० असे जिंकत उपांत्य फेरी गाठली. तिची आता माया च्वालिन्स्का हिच्याशी गाठ पडणार आहे.



सबालेन्का, गॉफ, श्वीऑटेक यांचे आव्हान संपुष्टात आल्यामुळे यंदाच्या फ्रेंच स्पर्धेत उपांत्य फेरीत पहिल्या पाचपैकी एकही मानांकित खेळाडू दिसणार नाही. उपांत्य फेरीत आठवी मानांकित मीरा आंद्रिवा ही सर्वोच्च मानांकन मिळालेली खेळाडू आहे.






# 'द्रोणाचार्यां'नी मार्गदर्शन केलेल्या खेळाडूंची गरुडभरारी

**मुंबई : प्रतिनिधी**

रोहित शर्मा, शार्दुल ठाकूर या स्टार भारतीय क्रिकेटपटूंचे शालेय प्रशिक्षक म्हणून दिनेश लाड ओळखले जातात; परंतु लाड यांनी केवळ या दोघांनाच घडवले नसून अनेक गुणवान क्रिकेटपटूंना त्यांनी मार्गदर्शन केले आहे. याचीच प्रचिती सध्या सुरू असलेल्या 'टी-२०' मुंबई लीग स्पर्धेद्वारे आली आहे. कारण एक-दोन नव्हे, तर त्यांचे मार्गदर्शन लाभलेले तब्बल ३० हून अधिक क्रिकेटपटू या स्पर्धेत खेळत आहेत. विशेष म्हणजे लाड यांचा लाडका शिष्य हिटमॅन रोहित शर्मा हा यंदाच्या लीगचा सदिच्छादूत आहे.



द्रोणाचार्य जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित लाड ३० वर्षांपासून बोरिवली-गोराई येथील स्वामी विवेकानंद इंटरनॅशनल स्कूल (एसव्हीआयएस) येथे विनामूल्य क्रिकेट प्रशिक्षण देतानाच शाळेबाहेरील अनेक गुणवान खेळाडूंनाही मोफत मार्गदर्शन करतात. लाड यांचे तब्बल ३७ विद्यार्थी यंदा 'टी-२०' मुंबई लीगमध्ये खेळत आहेत. यापैकी १३ 'एसव्हीआयएस'चे विद्यार्थी असून उर्वरित २४ क्रिकेटपटूंनी काही वर्षांच्या मर्यादित काळापुरते लाड यांचे मार्गदर्शन घेतले.

# रजत पाटीदारसाठीही उघडणार टीम इंडियाचे दरवाजे?



**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय संघ आयपीएल २०२६ नंतर आता अफगाणिस्तानविरूद्ध मालिकांसाठी सज्ज होत आहे. सुरुवातीला टीम इंडिया कसोटी सामना खेळणार आहे. यानंतर संघ वन डे मालिकेसाठी सज्ज होणार आहे. पण या वन डे मालिकेपूर्वी टीम इंडियाला विराट कोहलीच्या रूपात मोठा धक्का बसला. आधी रोहित शर्मा दुखापतीमुळे खेळणार की नाही हे निश्चित नसताला विराट कोहली दुखापतीमुळे स्पर्धेबाहेर झाला. विराटच्या दुखापतीमुळे आगामी मालिकेसाठी भारतीय संघात मोठ्या बदलाची शक्यता आहे. विराटच्या जागी ऋतुराज गायकवाडची वन डे संघात निवडीची दाट शक्यता असून, रजत पाटीदारला भारत 'अ' संघात संधी मिळू शकते.

अफगाणिस्तानविरुद्धची वन डे मालिका १४ जूनपासून धरमशाला येथे सुरू होत आहे. मात्र, आयपीएल अंतिम सामन्यादरम्यान कोहलीला हॅमस्ट्रिंग दुखापत झाल्याने त्याला किमान दोन आठवड्यांच्या विश्रांतीचा सल्ला देण्यात आला आहे. त्यामुळे वरिष्ठ निवड समितीला अखेरच्या क्षणी संघात बदल करावे लागणार आहेत. यापूर्वी रियान परागला दुखापत झाल्यानंतर गायकवाडला भारत 'अ' संघात स्थान देण्यात आले होते.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com